## राजर्षी शाहू महाराजांची जयंती उत्साहात

**राजुरा :** सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे जनक, लोकराजे, छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त आज स्थानिक ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र, भाजपा जनसंपर्क कार्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी विधानसभा निवडणूक प्रमुख देवराव भोंगळे यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी रमेश राऊत, बाबुराव भगत, प्रकाश मडावी, प्रकाश ढेंगरे, महेंद्र मोरे, यशवंत उलमाले, बाळकृष्ण वाघाडे, तुकाराम मामीडवार, देवराव सातपुते यांची उपस्थिती होती.

गुड मॉर्निंग

लोकशाही वार्ता

# चंद्रपूर

नागपूर, शनिवार, ६ जुलै २०२४/९

## राजुऱ्यात जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन

**राजुरा :** बालविद्या शिक्षण प्रसारक मंडळ राजुराद्वारा संचालित आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर राजुरा येथे जागतिक अंमली पदार्थविरोधी दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि पोस्टरद्वारे जनजागृती कार्यक्रम पार पडला. चंद्रपूर भारत स्काऊट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालयचे संघटक चंद्रकांत भगत, दीपा मडावी ,आदर्श शाळेच्या मुख्याध्यापिका नलिनी पिंगे, छत्रपती शिवाजी महाराज स्काऊट लीडर बादल बेले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी पोस्टरद्वारे ही जनजागृती केली. यावेळी प्रतापवार यांना वडाचे वृक्ष भेट देण्यात आले.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

# जिल्ह्यातील पहिल्या काजू उद्योगाची भद्रावतीत सुरुवात

### अभियंता अक्षय बंडावार या तरुणाने केला नवीन प्रयोग : तहसीलदार अनिकेत सोनवणे यांच्या हस्ते उद्घाटन

**लोकशाही वार्ता/भद्रावती**

नोकरीच्या मागे न लागता विविध प्रकारची उद्योग निर्मिती करून करिअर करण्याचा यशस्वी प्रयत्न अनेक तरुण आजकाल करताना दिसतात. चंद्रपूर जिल्ह्यात स्थानिक संसाधनावर आधारित अनेक छोटे-मोठे उद्योग आहेत. यात प्रोसेसिंग व मॅनुफॅक्चरिंगवर आधारित उद्योग कमीच आहेत. उद्योग उभा करताना नवीन प्रयोग करण्याचा विचार तरुण वर्ग अभावानेच करतो. मात्र, भद्रावतीच्या एका तरुणाने जिल्ह्यात नवीन प्रयोग करीत शहरात काजू उद्योग सुरू केला आहे. अश्रूड काजू उद्योग असे या उद्योगाचे नाव असून अक्षय बंडावार असे या उद्योगशील तरुणाचे नाव आहे. अक्षयने अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले आहे.

नुकतेच या उद्योगाचे तहसीलदार अनिकेत सोनवणे यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. यावेळी माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत शिंदे व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. हा एक प्रोसेसिंगवर आधारित उद्योग आहे. यात कच्च्या काजूवर प्रक्रिया करून विविध प्रकारचे काजू तयार करून त्याला बाजारात विकल्या जाते. दररोज



दोन टन काजूवर प्रक्रिया केली जाते. त्यासाठी एकूण दहा मशिनरीज लावण्यात आल्या आहेत. दक्षिण आफ्रिका, बेनिन, टांझानिया, घाना या देशातून रॉ काजू आयात करण्यात येत आहे. तर काही प्रमाणात कोंकणमधून देखील काजू बोलाविल्या जात आहे. या रॉ काजूवर प्रक्रिया करून काजूचे विविध प्रकार बनविल्या जाणार आहेत. राज्यात, राज्याबाहेर व देशाबाहेर काजूसाठी बाजारपेठ उपलब्ध आहे. जिल्ह्यात पहिल्यांदाच अशा प्रकारचा प्रयोग होत आहे. अभियंता अक्षयने सुरू केलेला हा काजू उद्योग जिल्ह्यात पहिलाच आहे. त्यासाठी त्याने या अगोदर सदर उद्योगाकरिता रितसर प्रशिक्षण घेतले आहे. मागील अनेक महिन्यांपासून त्याची तयारी सुरू होती. मशिनरीज इंस्टाल करून काजू बोलाविण्यात आला. आता प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात होणार आहे. अक्षयच्या या प्रयोगाचे परिसरात कौतुक होत आहे.

> सदर उद्योग चालू करण्यासाठी माझ्या आई-वडिलांनी मला साथ दिली. सोबतच आयपीएस आयुष नोपानी, आयपीएस नयोमी साटम व मित्रमंडळींचे मार्गदर्शन लाभले. उद्योग सुरू करण्यापूर्वी मी रीतसर प्रशिक्षण घेतले व हा नवीन प्रयोग सुरू करण्याचे धाडस केले आहे. यात यशस्वी होण्याचा मी नक्की प्रयत्न करेल.
>
> **– अक्षय बंडावार,**
> अश्रूड काजू उद्योग

## कै. अण्णाभाऊ साठे उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेशोत्सव

**लोकशाही वार्ता/जीवती**

तालुक्यातील कुंभेझरी येथील कै.अण्णाभाऊ साठे उच्च माध्यमिक विद्यालयात वर्ग ५ ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन शाळेच्या गेटवरच शाळेचे प्राचार्य पाचभाई, प्रा. गांजरे, प्रा. वावरे, प्रा. मालेकर, प्रा. जीवतोडे, प्रा. गोतावळे, लोडे, वाघमारे, जीवने, पेंदोर, भगत, डवरे, अहिरकर, नंदनवार, बुचे, मोतेवाड, नामवाड, बोरीकर आदी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांना चॉकलेट व पुष्पगुच्छ देऊन शाळेत स्वागत करून त्यांचा प्रवेश निश्चित केला. अशा आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांचा आज पहिला दिवस घेण्यात आला.

यावेळी वाघमारे व वावरे यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील वर्ग ५ ते ८ विद्यार्थ्यांना पेन, पुस्तके व कंपास व इतर साहित्य त्यांना भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन वाघमारे तर प्रास्ताविक गांजरे यांनी केले व अध्यक्षीय भाषणातून पाचभाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी कसे जगावे कसे वागावे व आयुष्य घडविण्यासाठी संस्कारित राहावे, असे सांगितले. पहिल्याच दिवशी शाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## उपक्रमशील स्मार्ट सरपंच नंदकिशोर वाढईच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल-बॅगचे वितरण

**लोकशाही वार्ता/राजुरा**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निबाळा येथे उपक्रमशील स्मार्ट सरपंच नंदकिशोर वाढई यांच्या हस्ते विद्यार्थ्यांसाठी स्कूल बॅग वाटप करण्यात आले. उन्हाळी सुटीनंतर



सोमवारी शाळेचा पहिला दिवस. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत अंतर्गत स्कूल बॅगचे वितरण करण्यात आल्याने सर्व विद्यार्थ्यांच्या चेहरे आनंदाने फुलून गेले. विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन केले आणि स्कूल बॅग मिळाल्याने आनंद व्यक्त केला.

यावेळी वाढई यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, ग्रामपंचायत कळमना नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. प्राथमिक शिक्षण हा माणसाचा जीवनाचा पाया आहे. प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांवर सुसंस्कार झालेत तर जीवनात निश्चितच फायदा होऊन सुजन नागरिक होण्यास मदत होते. उत्तम शालेय शिक्षणाची ओढ त्यांना लागून शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक तसेच विविध क्षेत्रात पुढे हेच विद्यार्थी सेवा कार्य करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी मुख्याध्यापक गोवारदिपे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर मेश्राम, पोलिस पाटील, गोपाल पाल, ग्रा.पं. सदस्य प्रियंका गेडाम, श्रावण गेडाम, देविदास झाडे, भोंगळे सर, पेदोर मॅडम अंगणवाडी सेविका यासह सर्व विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

## 'तपासणी ते उपचार आरोग्य योजनें'तर्गत फिरते वैद्यकीय कक्षाचे उद्घाटन

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांकरिता 'तपासणी ते उपचार आरोग्य योजना' राबविण्यास शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे. या अंतर्गत सदर योजनेचा शुभारंभ मंगळवारी (दि.२) जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

सदर योजनेमध्ये सर्व नोंदीत सक्रिय बांधकाम कामगार तसेच त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्य हे लाभार्थी असतील. तसेच पात्र लाभार्थी यांच्या उपचारावरील खर्च ५ लक्ष रुपये किंवा अधिक होणार असल्यास या योजनेच्या खर्चाच्या मर्यादेत नियुक्त संस्थेद्वारे सूचिबद्ध केलेल्या रुग्णालयांमार्फत उपचाराकरिता सदर लाभार्थी पात्र



राहतील.

तपासणी ते उपचार आरोग्य योजनेअंतर्गत फिरते वैद्यकीय कक्ष (एम एम यू) हे जिल्हा कामगार सुविधा केंद्र यांच्या क्षेत्रमध्ये कार्यरत असेल तसेच फिरते वैद्यकीय कक्ष (मोबाईल मेडिकल युनिट) वाहन स्वरूपामध्ये उपलब्ध असेल. तसेच टोल फ्री क्रमांक १८००२६६६६६६६६ वर संपर्क साधल्यास आवश्यक औषध व उपचारसुद्धा मिळेल, अशी माहिती फिरते वैद्यकीय कक्ष समन्वयक तथा जिल्हा एम. एम. यू. व्यवस्थापक आशिष चवरे यांनी दिली आहे. तसेच जास्तीत जास्त बांधकाम कामगारांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार यांनी केले आहे. उद्घाटन कार्यक्रमाला जिल्हा समनवयक रोशन सूर्यवंशी, डॉ. लुम्बिनी तावाडे, औषधी व्यवस्थापक प्रीती देवतळे, आरोग्य साथी जितेंद्र चांदेकर, सहायक औषधी व्यवस्थापक प्रफुल्ल काटकर, व्यवस्थापक पंकज चहारे, परिचारिका अश्विनी आसूटकर तसेच फिरते वैद्यकीय पथक वाहन चालक नाशिक मेश्राम उपस्थित होते.

## माजी विद्यार्थी मित्र परिवारातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

**लोकशाही वार्ता/गडचांदूर**

महात्मा गांधी विद्यालय, गडचांदूर येथील १९९६ मधील दहाव्या वर्गाच्या माजी विद्यार्थी मित्र परिवारातर्फे ऋणानुबंधातील आठवणीच्या भेटी गाठी व वर्ष २०२३ - २०२४ या सत्रातील दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच माजी मित्र-मैत्रिणींचा सत्कार सोहळ्याचे आयोजन २४ जूनला बालाजी सेलिब्रेशन गडचांदूर येथे करण्यात आले.

यानंतर दहावीच्या गुणवंत विद्यार्थी अनुष्का विलास दुबे (९४.४० टक्के) पहिला क्रमांक, शाश्वती सचिन वाघमारे (९१.२० टक्के) दुसरा क्रमांक, नयन दशरथ केळरझर (९०.२० टक्के) तिसरा क्रमांक, खुशी चंद्रकांत येलेकर (९०.०० टक्के) चौथा क्रमांक यांचा बक्षीस आणि शिल्ड देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी दत्ताभाऊ पुरी होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पंकजराव मत्ते, भाऊराव मत्ते, घाडगे, गोडसेलवार, विरूटकर, देरकर तसेच वांढरे यांनी भूषविले आणि अतिथी यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच सत्कारमूर्ती डॉ.मंजुषा पंकजराव मत्ते यांचा सत्कार माजी मैत्रिणीच्या हस्ते शाल श्रीफळ, ट्रॉफी देऊन करण्यात आला. त्यांच्या अथक प्रयत्नाने त्यांनी पीएच.डी. सारखी पदवी प्राप्त करून उल्लेखनीय कार्य केले. तसेच सर्व मित्र व मैत्रीण परिवाराला एकत्रित आणणाऱ्या राजूभाऊ ठेपाले व मैत्रीण सविता जेनेकर यांचा सत्कार सर्व मित्र मिळून व अहो ग्रुपने शाल श्रीफळ देऊन केला. या कार्यक्रमादरम्यान मित्र परिवारातील गीत गायन व लहान मुलांचा डान्सच्या माध्यमातून मनोरंजन करण्यात आले. तसेच आलेल्या मित्र-मैत्रिणींचा परिचय घेण्यात आला. मित्र परिवारातील नृत्यकलाकारांना प्रोत्साहनात्मक बक्षीस देण्यात आले.

## संकटग्रस्त व अत्याचारग्रस्त महिलांसाठी महिला निवासी संस्था आशेचे किरण

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने जिजामाता महिला वर्किंग वूमन हॉस्टेल, स्वाधार निवास गृह शक्तिसदन आणि सखी वन स्टॉप सेंटर या महिला निवासी संस्था चालविण्यात येत आहेत.

सखी वन स्टॉप सेंटर : ही योजना जिल्ह्यात मागील तीन वर्षांपासून जिल्ह्यात राबविली जात असून सखी वन स्टॉप सेंटर अंतर्गत मोफत आश्रय, वैद्यकीय सुविधा, कायदे विषयक मदत, समुपदेशन, रेस्क्यू सुविधा, पोलिसांची मदत पुरवली जाते. सखी वन स्टॉप सेंटर येथे आश्रय पाच दिवसांचा असतो व त्या पाच दिवसांमध्ये पीडित लाभार्थीला वरील सर्व सुविधा पुरविल्या जातात व महिलांचे पुनर्वसन करण्याचे प्रयत्न केला जातो. विशेष म्हणजे हे केंद्र २४ बाय ७ सुरू असते. सोबतच महिला हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १८१ वर या सेंटरद्वारे सेवा दिली जाते.

स्वाधार निवासगृह/शक्तिसदन : या योजने अंतर्गत जिल्ह्यात महिलांना मोफत निवास सेवा, समुपदेशन सेवा आणि प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर बनविण्याचे कार्य होत असून जिल्ह्यातील सरस्वती शिक्षण महिला मंडळ चंद्रपूर या संस्थेद्वारे ही सेवा दिली जात आहे. कौटुबिंक कलहाने बाधित तसेच निराश्रीत महिला या योजनेअंतर्गत लाभ घेऊ शकतात.

जिजामाता महिला वर्किंग वूमन हॉस्टेल : या योजने अंतर्गत नौकरी करणाऱ्या व तांत्रिक शिक्षणासाठी चंद्रपूर शहरात राहणाऱ्या महिलांना राहण्यासाठी वसतिगृहात माफक दरात उत्तम सोय उपलब्ध करुन दिली आहे. ही सेवा सर्वोदय महिला मंडळाद्वारे संचलित कली जाते. जिल्हा महिल व बालविकास अधिकारी कार्यालयअंतर्गत कार्यरत वरील सर्व संस्थांचा लाभ जिल्हयातील महिलांना घेता येणार असून पिडीत, निराधार आणि कौटुंबिक आधार नसलेल्या महिलांना वरील दोन्ही संस्था तर शहरात नोकरी निमित्त राहणाऱ्या महिला कर्मचारी यांच्यासाठी, जिजामाता महिला वर्किंग वूमन हॉस्टेल या संस्था अंतर्गत सेवा दिली जाते. जिल्हयातील नागरिकांना तिनही संस्थांना भेट द्यावी आणि ओळखीत गरजू महिला असेल तर त्यांना १८१ या महिला हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाने केले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून सामान्य रुग्णालयाची पाहणी

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

जिल्हा सामान्य रुग्णालयातील बांधकाम, अंतर्गत डागडुजी व इतर कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी शुक्रवारी (दि. ५) जिल्हा सामान्य रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.



मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर, तहसीलदार विजय पवार, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, येरगुडे, डॉ. जीवने, मार्ड संघटनेचे डॉ. अक्षय वाघमारे आदी उपस्थित होते.

इमारतीमध्ये काही ठिकाणी पाणी गळती होत असून सार्वजनिक बांधकाम विभागाने गळतीची कारणे शोधून त्वरित दुरुस्त करावे. अतिदक्षता विभाग अतिशय सुसज्ज करून लवकरात लवकर वातानुकूलीत यंत्रणा कार्यान्वित करावी. अंतर्गत दुरुस्ती व डागडुजीची काही कामे अजूनही शिल्लक आहेत. ती त्वरित पूर्ण करण्यासाठी संबंधित कंत्राटदारांना बांधकाम विभागाने सक्त निर्देश द्यावे. इतर कामांसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्यास त्याबाबतचे अंदाजपत्रक त्वरित सादर करावे. रुग्णालय प्रशासनाने संपूर्ण परिसराची स्वच्छता ठेवावी. पाण्याच्या टाक्या, अंतर्गत नालेसफाई नियमित करावी. पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या निवासी वसतीगृहात अंतर्गत सुविधा चांगल्या असणे आवश्यक आहे, याबाबत विशेष लक्ष द्यावे. सिटी स्कॅन मशिन बंद राहता कामा नये. दुरुस्तीबाबत संबंधित एजन्सीला निर्देश द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी संबंधितांना दिल्या. यावेळी त्यांनी अपघात विभाग, डे-केअर सेंटर, अतिदक्षता विभाग, प्रसूती विभाग, स्त्रीरोग, बालरोग विभाग तसेच नवजात शिशू अतिदक्षता कक्षाची पाहणी केली.

## चाईल्ड हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक '१०९८' ठरतोय मुलांच्या समस्येवर समाधान

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अंतर्गत जिल्हा चाईल्ड हेल्पलाईन आणि रेल्वे चाईल्ड हेल्पलाईन कार्यान्वित असून, दोन महिन्यांत जिल्ह्यातील ७५ मुलांनी या सेवेचा लाभ घेतला आहे. यामध्ये बालविवाह, बालशोषण, बालकामगार, बालभिक्षेकरी, निवाऱ्याची गरज असलेली, हरवलेली बालके, समुपदेशनाची गरज, कौटुबिंक हिंसाचार पीडित बालके आदी प्रकारच्या मदतीसाठी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ ला हाक दिलेल्या बालकांचा समावेश आहे.

चाईल्ड हेल्पलाईन १०९८ ही मोफत टेलिफोनिक सेवा आहे, जी २४ तास ७ दिवस कार्यरत असते. ० ते १८ वर्ष वयोगटातील काळजी आणि संरक्षणाची गरज असणारी बालके यांच्यासाठी आपली सेवा देत असते. १०९८ या टोल फ्री क्रमांकावर फोन केल्यावर हा फोन चाईल्ड हेल्पलाईन कंट्रोल रूमला जोडला जातो. यानंतर ज्या जिल्ह्यातून बालक मदत मागतो आहे, त्या जिल्ह्याला त्वरित जोडला जातो. यानंतर संबंधित जिल्ह्यातील चाईल्ड हेल्पलाईनचे कर्मचारी बालकापर्यंत ३० मिनिटांच्या आत पोहोचतात व त्या बालकाला प्रथमतः सुरक्षित ठिकाणी हलविले जाते. बालकांचे पुनर्वसन होईपर्यंत बालकल्याण समिती बालकासोबत कार्य करीत असते. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात जिल्हा चाईल्ड हेल्पलाईन आणि रेल्वे चाईल्ड हेल्पलाईन बालकांसाठी मोफत सेवा दिली जात आहे. वरीलप्रमाणे काळजी आणि संरक्षणाची गरज असणारी बालके आढळल्यास १०९८ या जिल्हा चाईल्ड हेल्पलाईनच्या टोल फ्री क्रमांकावर फोन करून माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाने केले आहे.

## आरोग्य क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने काम करणारा डॉक्टर हा देव माणूस - कडू

### डॉक्टर्स डे, कृषी दिनानिमित्ताने डॉ. रॉय, वसंतराव नाईक यांना अभिवादन

**लोकशाही वार्ता/वरोरा**

डॉ. बिधान चंद्र रॉय यांचे वैद्यकीय विश्वातील योगदान आज अनेक डॉक्टरांसाठी प्रेरणादायी आहे. कृषी क्षेत्रात वसंतराव नाईक यांनी हरित क्रांती घडवून शेतकऱ्यांना संजीवनी दिली. शेतकरी हा जगाचा पोशिंदा तर आरोग्य क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने काम करणारा डॉक्टर हा देव माणूस आहे, असे प्रतिपादन महारोगी सेवा समिती, वरोरा (आनंदवनाचे) विश्वस्त सुधाकर कडू यांनी येथे केले.

महान चिकित्सक डॉ.बी. ही. रॉय, हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आनंदवन मित्र मंडळ वरोरा, ओशनिक बहुउद्देशीय संस्था वरोरा, वरोरा- भद्रावती - चंद्रपूर रेल्वे प्रवासी संघ तथा उपजिल्हा रुग्णालय वरोरा यांचे संयुक्त विद्यमाने उपजिल्हा रुग्णालय, वरोरा येथील ग्रीन शेड भवनात आयोजित ह्यडॉक्टर्स डेह्व व ह्यकृषी दिनह्व कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वरोरा उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रफुल्ल खुजे होते. मंचावर राष्ट्रीय सामाजिक न्याय कृति मंचाचे महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र मर्दाने, आनंदवन मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण मुधोळकर, वरोरा उपजिल्हा रुग्णालयातील अधिसेविका वंदना बरडे आदी



उपस्थित होते.

कार्यक्रमात उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बुटोलिया, डॉ. शेंडे, डॉ. पवार, डॉ. जाधव, डॉ. शिंदे, डॉ.गेडाम, परिसेविका रूबिना खान, अश्विनी बागडे, शीतल राठोड, इंदिरा कोडापे, सरस्वती कापटे, सुनंदा पुसनाके, अश्विनी बागडे, तुलसी कुमरे, विजया रुईकर, संगिता नकले, तनिष्का खडसाने, कुंदा मडावी, आरोग्य सहाय्यक सतिश येडे, वरिष्ठ लिपिक ओमकार मडावी, समुपदेशनक गोविंद कुंभारे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. संचालन व आभार प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी सोनाली रासपाईले यांनी केले. यशस्वीतेसाठी वरोऱ्यातील आनंदवन मित्र मंडळ, ओशनिक बहुउद्देशीय संस्था, उपजिल्हा रुग्णालय व वरोरा - भद्रावती - चंद्रपूर रेल्वे प्रवासी संघाचे पदाधिकारी राहुल देवडे, बंडू देऊळकर, संजय गांधी, प्रा. बी.आर. शेलवटकर, शाहीद अख्तर, विवेक बर्वे, प्रवीण गंधारे, नाना नेरकर, शरद नन्नावरे, ओकेंश्वर टिपले, भारत पातालबंसी, विजय वैद्य, उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी वृंद लक्ष्मीकांत टाले, बंडू पेटकर, अमोल भोंग, विजय उईके आदींनी योगदान दिले. कार्यक्रमात उपजिल्हा रुग्णालयाचे कर्मचारी, स्वंयसेवी संस्थांचे पदाधिकारी, महिला व सजग नागरिकांची उपस्थिती होती.

## आषाढी पंढरपूर यात्रेकरिता चंद्रपूर विभागांमार्फत जादा बसेसची सोय

**लोकशाही वार्ता/चंद्रपूर**

दरवर्षी आषाढी यात्रेनिमित्त महाराष्ट्रातील वारकरी पंढरपूर येथे दर्शनाकरीता जातात. यावर्षी सदर यात्रा पंढरपूर येथे १३ ते २२ जुलै २०२४ या कालावधीत भरणार आहे. यात्रेकरिता जाणारे वारकरी दरवर्षी एस.टी. बससेवेचा लाभ घेऊन वारी पूर्ण करीत असल्याने चंद्रपूर जिल्ह्यातील वारक-यांना जाणे-येणे सोयीचे व्हावे याद्दष्टीने वारकऱ्यांनी किमान ४० च्या गटाने बसची मागणी केल्यास चंद्रपूर, राजूरा, चिमूर व वरोरा या आगारातून बस पूरविण्याची व्यवस्था रा.प.महामंडळाच्या चंद्रपूर विभागाने केलेली आहे.

सदर यात्रेकरीता उपरोक्त प्रमाणे प्रवाशी प्रतिसाद मिळाल्यास विभागातून जादा बसेस यात्रेकरिता सोडण्यात येईल. तसेच सदर जादा बसेसमध्ये ६५ वर्ष ते ७५ वर्ष वयांचे ज्येष्ठ नागरिकांना तिकिट दरात ५० टक्के सवलत, व ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत मोफत प्रवासाची सवलत, तसेच सर्व महिलांना महिला सन्मान योजनेअंतर्गत तिकिटांमध्ये ५० टक्के सवलत व शासनाने ठरवून दिलेल्या इतर सोई सवलती देय राहतील. तरी पंढरपूर यात्रेकरिता जाणारे भाविक भक्तांनी चंद्रपूर विभागातील चंद्रपूर आगार रामटेके, आगार व्यवस्थापक, मो. नं. ९६२३७६७५०५, ०७१७२-२५१७७९, राजूरा आगार बोधे, आगार व्यवस्थापक, ७९७२९५९३१२,०७१७३-२२२२१६, चिमूर आगार व्यवस्थापक शिंदे, आगार व्यवस्थाापक, ९३०७७८६०८३, ०७१७३-२६५५४६, वरोरा आगार व्यवस्थापक वर्धेकर ९७६७२०९६४६ ०७१७६-२८२९४८, उपरोक्त अधिकारी यांच्याशी संपर्क साधून जास्तीत जास्त भाविकांनी यात्रेकरिता जाणारे जादा बस सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन स्मिता सुतवणे, विभाग नियंत्रक, रा.प. चंद्रपूर यांनी केला आहे.

लोकशाही वार्ता
# भंडारा
नागपूर, शनिवार, ६ जुलै २०२४ / १०
गुड मॉर्निंग

## मध्यस्थी करणाऱ्या महिलेला मारहाण

**भंडारा :** मासोळीच्या हिस्सेवाटणीत मध्यस्थी करणाऱ्या महिलेला आरोपींनी मारहाण केल्याची घटना चौंडेश्वरी मंदिरजवळ मोहाडी येथे ३ जुलै रोजी ७.३० वाजताच्या सुमारास घडली. आरोपी पिंटू अशोक मडावी (३५), अशोक आनंद टेकाम (४५), राजू अण्णाजी कळमंजी (२२) सर्व रा. चौंडेश्वरी मंदिरजवळ मोहाडी हे मासोळीच्या हिस्सेवाटणीवरून भांडत होते. तेव्हा फिर्यादी गंगूबाई अण्णाजी कळमंजी (४५) हिने त्यांना भांडण न करीता आपसात सामंजस्याने वाटणी करून घेण्यास सांगितले. यावरून तिन्ही आरोपींनी त्यांना थापडबुक्क्याने मारहाण केली.

## मद्यपी चालकांवर गुन्हा दाखल

**भंडारा :** मद्य प्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सचिन बाबुराव बडोले (३७) रा. रमाबाई आंबेडकर वॉर्ड भंडारा हा मद्य प्राशन करून दुचाकीने ( क्र एमएच ३६ एसी ९१२३) मिस्कीन टँक गार्डन समोरून जात असताना पोलिसांनी त्याला अडविले. तेव्हा तो मद्य प्राशन करून होता. ब्रेथ ॲनालायझर मशीनद्वारे त्याची तपासणी केली असता अल्कोहोलचे प्रमाण १२६.४ एमजी पॉझिटीव्ह प्रमाण मिळून आले. अजय नत्थूजी वंजारी (३५) रा. राणी लक्ष्मीबाई वॉर्ड भंडारा हा मोटारसायकल क्र. एमएच ३६ एच ४५६ दारूच्या नशेत चालविताना मिळून आला.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### दृष्टिक्षेप

## भांडणात मध्यस्थी करणे पडले महागात

**भंडारा :** दोन मोटरसायकलस्वारांमध्ये होत असलेले भांडण सोडविणे एका इसमाला महागात पडले. आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्याने मारहाण करून त्यांच्या खिशातून २ हजार रुपये जबरी हिसकावून नेले. ही घटना खांब तलव चौक भंडारा येथे ४ जुलै रोजी १ वाजताच्या सुमारास घडली. फिर्यादी मंगेश अशोक मुरकुटे (४१) रा. रविंद्रनाथ टागोर वॉर्ड भंडारा हे खांब तलव चौक भंडारा येथे दोन मोटारसायकल स्वारांमध्ये होत असलेले भांडण सोडविण्यासाठी गेले. मात्र, त्या मोटारसायकल स्वारांनी आपसातील भांडण सोडून मंगेश मुरकुटे यांनाच मारहाण करण्यास सुरूवात केली. यावेळी त्यांना लाथाबुक्क्याने, चाकू व लोखंडी रॉडने मारून गंभीर जखमी केले. व त्यांच्या खिशातून २ हजार रुपये देखील हिसकावून नेले. मंगेश मुरकुटे यांच्या तक्रारीवरून अमन मस्तान रा. बैरागी वाडा भंडारा, अनिकेत केकडा रा.कस्तुरबा गांधी वॉर्ड भंडारा, कालु मेश्राम रा. कस्तुरबा गांधी वॉर्ड भंडारा व दोन अनोळखी यांच्याविरुद्ध भंडारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## खांब काढले म्हणून इसमाला शिवीगाळ

**भंडारा :** टेलिफोनचा खांब आपल्या शेतात लावला या कारणाने दोघांनी एका इसमाला अश्लिल शिवीगाळ केल्याची घटना ३ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता बाम्पेवाडा येथे घडली. ४५ वर्षीय महिला रा. बाम्पेवाडा यांच्या वॉल कम्पाऊंडजवळ सरकारी टेलिफोनचा खांब लावलेला होता. कम्पाऊंडला प्लास्टर मारताना हा खांब मधात येत असल्याने फिर्यादीच्या पतीने खांब काढून आपल्या शेतात लावला. हे माहित होताच आरोपी हेमराज नंदलाल हेमने (४५) व गणेश पुणा हेमने (२५) दोन्ही रा.बाम्पेवाडा हे त्यांच्या घरी येऊन टेलीफोनचा खांब आमचा आहे तुम्ही कशाला काढला, असे बोलून अश्लिल शिवीगाळ केली. तक्रारीवरून साकोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# भंडारा विधानसभेवर भाजपचा दावा

## विधानसभेच्या तोंडावर वाद निर्माण होण्याची शक्यता

**लोकशाही वार्ता / भंडारा**

तीन महिन्यानंतर होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भंडारा विधानसभेवर भाजपने दावा ठोकल्याने महायुतीमध्ये नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यमान आमदार नरेंद्र भोंडेकर हे काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

सन २००९ मध्ये युतीच्या धोरणानुसार भंडारा विधानसभेची जागा शिवसेनेच्या वाट्याला आली होती. २०१४ मध्ये भाजपने विजय मिळविला होता. त्यानंतर २०१९ मध्ये अपक्ष उमेदवार नरेंद्र भोंडेकर यांनी या मतदारसंघावर दुसऱ्यांदा विजय मिळविला. दोन वर्षांपूर्वी राज्यात झालेल्या राजकीय उलथापालथीनंतर अपक्ष आमदार नरेंद्र भोंडेकर हे शिंदे गटासोबत गेले. अलीकडेच मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नरेंद्र भोंडेकर यांनी शिवसेनेत (शिंदे गट) अधिकृत प्रवेश केला.

तथापि, २०१९ मध्ये नरेंद्र भोंडेकर हे अपक्ष लढल्याचे भाजपचे स्थानिक नेते सांगतात. भंडारा विधानसभा मतदारसंघ हा भाजपचा पारंपारिक मतदारसंघ असल्याने येत्या विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघावर आम्ही दावा करणार असून पक्षश्रेष्ठी जो उमेदवार देतील त्याला पूर्णपणे सहकार्य करण्याचे भाजपच्या वतीने सांगण्यात येत आहे. शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस असे तीन पक्ष महायुतीत असल्यामुळे भंडाराची जागा शिवसेनेच्या वाट्याला, साकोली भाजप आणि तुमसर राष्ट्रवादीकडे जाणार असल्याचे बोलले जात आहे. पण, भाजपने भंडाराची जागा आपल्याकडे खेचून आणण्यात यश मिळविले तर आ. नरेंद्र भोंडेकर यांची भूमिका काय असेल, यावर आता चर्चा सुरू झाल्या आहेत.

भंडारा विधानसभेवर भाजपने दावा करण्यामागे अलीकडेच झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याची किनार आहे. मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाला भाजपच्या नेत्यांना जाणीवपूर्वक डावलल्याचा आरोप भाजपने केला होता. त्याला प्रतिउत्तर देत आ. नरेंद्र भोंडेकर यांनी भाजपच्या नेत्यांवर बोचरी टीका केली होती. लोकसभा



निवडणुकीत भाजप उमेदवाराच्या झालेल्या पराभवाचीही या वादात भर पडली होती. त्यामुळेच भंडारा विधानसभेवर भाजपने आपला दावा कायम ठेवला आहे. आता विधानसभा निवडणुकीत महायुतीचे नेते या मतदारसंघाबाबत काय निर्णय घेतात, याकडे लक्ष लागून आहे.

# शेतकऱ्यांच्या पिकांना भाव देण्यावर भर

## नवनिर्वाचित खासदार डॉ.पडोळे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**लोकशाही वार्ता / भंडारा**

गेल्या काही वर्षांत शहरातील रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. प्रत्येक रस्त्यावर खड्डे पडले आहेत. शहरातील नागरिकांना दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे. घर देताना दोन हजार लोकसंख्या असलेल्या गावात पाच-दहा घरे मंजूर केली जातात. कोल्ड स्टोरेज आणि बाजारपेठेअभावी शेतमालाला भाव मिळत नाही. स्थानिक समस्या सोडविण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या पिकांना रास्त भाव देण्यावर भर दिला जाणार आहे, अशी माहिती नवनिर्वाचित खासदार डॉ.प्रशांत पडोळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

खासदार डॉ.पडोळे म्हणाले की, शहरात एकही उद्यान नाही जिथे, लोकांना बसता येईल किंवा फिरता येईल. सर्वत्र घाण पसरली आहे. पडोळे यांनी नागरिकांना कचरा डस्टबिनमध्येच टाकण्याचे आवाहन



केले. तसेच अस्वच्छता व खराब रस्त्यांना जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांसह शहरातील परिस्थितीची माहिती घेतली. खासदार पडोळे यांनी गुरुवारी संपूर्ण शहराचा आढावा घेतल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी खराब रस्त्यांची समस्या आणि जलशुद्धीकरणात पसरणारी अस्वच्छता या समस्या जवळून जाणून घेतल्या. पडोळे म्हणाले, जिल्हा धान उत्पादनासाठी ओळखला जातो. त्यासाठी शेतकऱ्यांच्या प्रगतीवर भर देणार आहोत. त्यांच्या पिकांना रास्त भाव देण्यासाठीही आम्ही काम करू. कोल्ड स्टोरेजसारख्या सुविधा देण्यावर भर दिला जाणार आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला भाव देण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाईल. पडोळे म्हणाले की, शहरातील अनेक भागात अमली पदार्थांचे व्यसन वाढले आहे. तरुण पिढी ड्रग्जच्या आहारी जात आहे. हे थांबवण्यासाठी संबंधित विभागासोबत बैठक घेणार आहे.

## राष्ट्रीय महामार्गावरील ७० फूट लांब सुरक्षा भिंत पहिल्याच पावसात कोसळली

**लोकशाही वार्ता /लाखांदूर**

लाखांदूर ते अंतरगाव या राष्ट्रीय महामार्गावरील नाक्याजवळ बांधलेली सिमेंट काँक्रीटचे सुरक्षा भिंत यंदा पहिल्यांदाच झालेल्या मुसळधार पावसाने कोसळली असून मुख्य सिमेंट रस्त्यालगत लावलेले गट्टू पूर्णतः जमीनदोस्त झाले आहेत.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ सी या महामार्गाचे सिमेंटीकरण करताना सुरुवातीपासूनच अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. लाखांदूर ते अंतरगाव या महामार्गावरील नाल्यावर पुलाचे बांधकाम करताना दोन्ही बाजूला जवळपास दहा फूट उंचीची सिमेंट काँक्रीटचे सुरक्षा भिंत बांधण्यात आली. मात्र, सुरक्षा भिंतीचे बांधकाम करताना नियमांचे पालन करण्यात आले नाही.

सबंधित कंत्राटदारांनी अत्यंत निकृष्ट साहित्याचा वापर केला. त्यामुळे मुसळधार पावसामुळे सुरक्षा भिंतच कोसळून जमीनदोस्त झाली आहे. सोबतच सिमेंट रस्त्यालगत लावलेले गट्टूसह जमीनदोस्त झाली असून रस्त्यालाकडेला पडलेले आहे.



जवळपास ७० फूट लांब सुरक्षा भिंत जमीनदोस्त झाल्याने या कामात किती भ्रष्टाचार झाला याचा ज्वलंत पुरावाच बघायला मिळत आहे. तसेच संपूर्ण महामार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे भगदाड पडलेले दिसून येत आहे. संबंधित विभाग चौकशी करून कारवाई करणार काय? सदर निकृष्ट करण्यात आलेल्या बांधकामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रकाश देशमुख तसेच उपाध्यक्ष आशिष शहारे यांनी केली आहे.

## पाचशेची नकली नोट आढळली

**भंडारा :** तालुक्यातील मानेगाव (बाजार) येथील विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या शाखेतून बोरगाव बूज. येथील शेतकरी भाऊराव नत्थू वाघमारे यांनी ५० हजारांची नगद राशी काढली आणि पीक विम्याचे कर्ज भरण्यासाठी इलाहाबाद बँकेत गेले. यावेळी एक ५०० रुपयांची नोट नकली असल्याचे व्यवस्थापकाने सांगितले. त्यामुळे शेतकऱ्याला धक्काच बसला. वाघमारे यांचेकडे इलाहाबाद बँकेचे पीक विमा कर्ज होते. त्यासाठी त्यांनी विदर्भ ग्रामीण बँकेतून पन्नास हजार रुपये काढले.

# प्रकल्पग्रस्तांच्या हक्कासाठी साखळी उपोषण

**लोकशाही वार्ता /साकोली**

मागील ११ वर्षांपासून प्रलंबित असलेला मुंडीपार येथील भेल प्रकल्प सुरू करण्यात यावा याकरिता प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेचे अध्यक्ष विजय नवखरे व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने भेल प्रकल्प लवकरात लवकर सुरू करण्यासंदर्भात साखळी उपसनाचे आयोजन करण्यात आले होते.

भेल प्रकल्प मागील ११ वर्षांपासून का सुरू झाले नाही याची उच्च न्यायालय मार्फत न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, ७ दिवसाच्या आत भेल प्रकल्प




संदर्भात लेखी आदेश देण्यात यावे, भूमी अधिग्रहण अध्यानुसार जमीन परत अथवा वाढीव मोबदला भेल तर्फे देण्यात यावा, भेल प्रकल्पामध्ये अडचणी असतील तर त्या ठिकाणी दुसरा प्रकल्प आणावा, परिवारातील एका सदस्याला वयाची अट न ठेवता कायमस्वरुपी काम उपलब्ध करून द्यावा, जोपर्यंत भेल अथवा दुसरा प्रकल्प येत नाही तो पर्यंत ती जागा शेतकऱ्यांना मशागतीकरिता द्यावी, केंद्र सरकारने भेल प्रकल्पाचे २४० कोटी रुपयांचे अनुदान का देण्यात आले नाही, अशा विभिन्न मागण्या यावेळेस करण्यात आल्या.

या प्रसंगी चर्चा करताना प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष विजय नवखरे, साकोली तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष अशोक कापगते, श्याम शिवणकर, रामटेके, हरिश दोनोडे, कृष्णा रोकडे, विलास दोनोडे, सुरेखा लांडगे आणि मोठ्या प्रमाणावर प्रकल्पग्रस्त शेतकरी बंधू उपस्थित होते.

# राजर्षी शाहू महाराज परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजनेतील जाचक अटी रद्द करा

### केंद्रीय मानवाधिकार संघटन व समविचारी सामाजिक संघटनांची मागणी

**लोकशाही वार्ता / भंडारा**

राजर्षी शाहू महाराज परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजनेत केलेले भेदभावपूर्ण व असंवैधानिक बदल रद्द करून योजनेच्या अटी व शर्ती पूर्वीप्रमाणे कायम ठेवण्याबाबत केंद्रीय मानवाधिकार संगठन नवी दिल्ली, शाखा भंडारा जिल्हा व समविचारी सामाजिक संघटनांचे निवेदन जिल्हाधिकारी भंडारा यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्नाची अट २० लक्ष इतकी करण्यात यावी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभागांतर्गत परदेश शिष्यवृत्तीकरिता पहिल्या १०० विद्यापीठाकरिता उत्पन्नाची मर्यादा नसल्याची अट पूर्ववत ठेवण्यात यावी, पदवी-पदव्युत्तरसाठी शिष्यवृत्तीची मर्यादा ३० लाखापर्यंत व पीएचडीसाठी ४० लाखापर्यंत करण्यात आली आहे. ती रद्द करून अभ्यासक्रमाचे संपूर्ण शिक्षण शुल्क देण्यात यावे, शिष्यवृत्तीसाठी पदवीमध्ये ७५ टक्के गुण तसेच पदव्युत्तरमध्ये ७५ टक्के गुण ही अट रद्द करण्यात यावी व पूर्वीप्रमाणेच ५५ टक्के व ६० टक्के गुण मर्यादा कायम ठेवावी, शिष्यवृत्तीचा लाभ एका कुटुंबातील एकच विद्यार्थी घेऊ शकेल ही अट रद्द करण्यात यावी व पूर्वी



प्रमाणेच हा लाभ कुटुंबातील दोन विद्यार्थ्यांना देण्यात यावा, असे ठरविण्यात यावे, पदव्युत्तरसाठी एकदा शिष्यवृत्ती मिळाली तर पुढे पीएचडी करण्यासाठी शिष्यवृत्ती मिळणार नाही, ही अट रद्द करण्यात यावी व पूर्वीप्रमाणेच पदव्युत्तरनंतर पीएचडी करण्यासाठी शिष्यवृत्ती देण्यात यावी आदी मागण्यांचा समावेश आहे.

निवेदन देतांना केंद्रीय मानवाधिकार संघटना नवी दिल्लीचे महाराष्ट्र राज्य प्रभारी डॉ. देवानंद नंदागवळी, महाराष्ट्र राज्य अनुदानित वसतिगृह कर्म. संघटनाचे प्रदेश उपाध्यक्ष जयेंद्र गुलाब देशपांडे, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदचे भंडारा जिल्हाध्यक्ष नाशिक चवरे, संविधान बचाव संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष अचल मेश्राम, राष्ट्रीय अमर कला निकेतन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अंबादास नागदेवे, समता सैनिक दल भंडाराचे श्रीराम बोरकर, मंगेश हुमने, महेंद्र तिरपुडे, प्रियदर्शन सोनटक्के, सोपान रंगारी, सरयू डहाट, दर्शना तिरपुडे इत्यादी सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# बँकेसमोरून चोरट्यांनी पळविले ४० हजार रुपये

**लोकशाही वार्ता /लाखांदूर**

'तुमचे पैसे पडले आहेत', अशी बतावणी करत दुचाकी थांबवायला भाग पाडून दुचाकीच्या डिक्कीतून पैशाची पिशवी चोरट्यांनी लंपास केली. ही घटना लाखांदूर शहरातील स्टेट बँकेसमोर आज दुपारी घडली. या पिशवीमध्ये बँकेतून काढलेले ४० हजार रुपये होते. ते घेऊन चोरटे दुचाकीवरून पसार झाले.

बिसेन वासनिक रा. सोनी हे शुक्रवारी बँकेत पैसे काढण्याकरिता आले होते. त्यांनी बँकेतून ४० हजार रुपये काढले. त्यानंतर बँकेतून परत जात असताना 'तुमचे पैसे पडले आहेत', अशी बतावणी करीत वासनिक यांना चोरट्यांनी आवाज देत वासनिक यांनी डिक्कीत ठेवलेले पैसे डिक्कीतून काढून चोर पसार झाले.

ही संपूर्ण घटना बँकेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. सदर घटनेची माहिती लाखांदूर पोलिसांना मिळताच लाखांदूरचे पोलिस निरीक्षक सचिन पवार हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बँकेतील सीसीटीव्ही फुटेज तपासून तपासाची चक्रे फिरवली. अधिक तपास सुरू आहे.

## शहीद नितीन खेडीकर यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार

**लोकशाही वार्ता/साकोली**

बाम्पेवाडा येथील नितीन वामन खेडीकर हे भारतीय सेनेत अरुणाचल प्रदेश येथे कर्तव्यावर असताना त्यांचे ४ जुलै रोजी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ६ जुलै रोजी सकाळी बाम्पेवाडा येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहे.

नितीन वामन खेडीकर हे २००५ मध्ये भारतीय सेनेत सैनिक



म्हणून रुजू झाले. आज ते भारतीय सैन्यात हवालदार या पदावर कार्यरत होते. ४ जुलै रोजी अरुणाचल प्रदेशातील टेंगा येथे कर्तव्यावर असताना अचानक त्यांना हृदयविकाराच्या तीव्र धक्का आला. त्यामुळे त्यांची प्राणज्योत मालवली.

बाम्पेवाडा येथील शेतकरी वामन खेडीकर यांना तीन मुले असून नितीन हे सर्वात मोठे होते. त्यांचा दुसरा मुलगा अश्विन खेडीकर हे महाराष्ट्र पोलिस दलात पोलिस उपनिरीक्षक आहेत. तर तिसरा मुलगा स्वप्निल खेडीकर हे सुद्धा भारतीय सैन्यात कार्यरत आहेत. नितीन खेडीकर यांना ८ वर्षांची मुलगी आणि ५ वर्षांचा मुलगा आहे.

# खड्ड्यात 'थ्री' फेजचे वाकले खांब

## शेतकऱ्यांच्या जीवावर उठणार, बिनाखीतील प्रकार



**लोकशाही वार्ता /सिहोरा**

थ्री फेज विजेचा पुरवठा करण्यासाठी उभे करण्यात आलेले खांब आता शेतकरी आणि महिला मजुरांच्या जीवावर उठणार आहेत. शेतशिवारात उभे करण्यात आलेल्या अनेक खांबाचे मजबुतीकरण करण्यात आले नाही. हे खांब फक्त खड्ड्यात उभे आहेत. पावसाळ्यात उभे खांब कोसळण्याची भीती आहे. हा धक्कादायक प्रकार बिनाखी गावाचे शेत शिवारात निदर्शनास आलेला आहे.

सिहोरा परिसरात सिंगल फेज विद्युत पुरवठा योजना असल्याने थ्री फेज वीज जोडणीच्या कामांना गती देण्यात आली आहे. सिहोरा १ आणि सिहोरा २ अशी विभागणी करण्यात आली आहे. सिहोरा-२ अंतर्गत गावांना थ्री फेज वीज जोडणी देण्यात आली आहे. घरगुती वीजग्राहकांना थ्री फेज विजेचा पुरवठा सुरू करण्यात आला आहे. घरगुती आणि कृषिपंपधारक शेतकऱ्यांना थ्री फेज विजेचा पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र विद्युत ट्रान्सफॉर्मर लावण्यात आले आहेत. यात कृषिपंपांना आठ तास विजेचा पुरवठा करण्यात येत आहेत. परंतु, तांत्रिक अडचणीमुळे थांबलेली सिहोरा १ अंतर्गत गावांना थ्री फेज वीजपुरवठा करणाऱ्या जोडणीचे कामे लांबणीवर गेले होते.

### खांब कोसळण्याची शक्यता

पावसाळ्यात कामे लांबणीवर जाण्याची शक्यता आहे. बिनाखी गावाचे शिवारात जलजीवन मिशन आणि गावात थ्री-फेज विजेचा पुरवठा करण्यासाठी खांब उभे करण्यात आलेले आहेत. या खांबाचे मजबुतीकरण करण्यात आले नाही. खड्यात ही खांब उभे करण्यात आल्याने खांब वाकलेले आहेत.

# पीक विम्याची रक्कम शासनाला केली परत

**लोकशाही वार्ता /मोहाडी**

खरीप हंगाम २०२३ मध्ये शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत पीक विमा काढला होता. नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे धान शेतीचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे विमा कंपनीकडून सर्व्हे करण्यात आला होता. परंतु, विमा कंपनीकडून शेतकऱ्यांची थट्टा करण्यात आली. त्यामुळे मोहाडी तालुक्यातील पालडोंगरी येथील शेतकरी सुखदास गोमा डहाके यांनी पीक विम्याचा १८०० रुपयांचा धनादेश उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांना परत केला.

नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान होत असते. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावा लागतो. याच परिस्थितीमुळे काही शेतकरी हे आपले कर्ज न फेडू शकल्यामुळे स्वतःचे जीवन संपविण्याचे निर्णय घेतात. आर्थिक नुकसानीमुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे.

शेतपिकाला सुरक्षा कवच म्हणून पीक विमा काढला जातो. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीकडून आर्थिक मदत दिली जाते. मागील वर्षांत शासनाकडून पीक विमा योजनेत बदल करण्यात आले व पीक विमा रक्कम १ रुपयां करण्यात आली. त्यामुळे मोहाडी तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पीक विमा काढला. मात्र, सद्या परिस्थितीत अवकाळी पाऊस तसेच विविध रोगांचा मोठ्या प्रमाणात होणारा प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मर्यादा आली आहे. पीक पेरणीपासून ते काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आग, वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ, पूर, दुष्काळ, कीड व रोग यामुळे नुकसान झाल्यास विमा शेतकऱ्यांना मिळण्याची तरतूद आहे.

### जिल्हाधिकारी लक्ष देतील का?

मोहाडी तालुक्यातील शेतकाऱ्यांनी मोठ्या संख्येने खरीप हंगाम २०२३ मध्ये पीक विमा काढलेला होता. नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यांत मोठ्या प्रमाणात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. प्रशासनाकडून नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे करण्यात आले. शेतकऱ्यांच्या या परिस्थितीची नोंद महसूल विभाग व कृषी विभागाकडे असताना सुद्धा शेतकऱ्यांना मिळत असलेली पीक विम्याची रक्कम ही तुटपुंजी आहे. बऱ्याच शेतकऱ्यांना मिळणारी पीक विम्याची रक्कम १०००, १५०० रुपये अशी अत्यल्प आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळत असलेल्या अत्यल्प विमा रकमेबाबतच्या प्रश्नाकडे जिल्हाधिकारी लक्ष देतील का? असा प्रश्न शेतकरी करीत आहेत.



## भाडे तत्त्वावर दिलेल्या नझूल जमिनीबाबत अभय योजना मोहीम

**भंडारा :** नागपूर व अमरावती विभागातील निवासी प्रयोजनार्थ भाडे तत्त्वावर दिलेल्या नझूल जमिनी संदर्भात विशेष अभय योजना २०२४-२५ बाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. प्रस्तूत अभय योजना ज्या नझूल जमिनी निवासी प्रयोजनार्थ लिलावाद्वारे- प्रिमियम अथवा अन्य प्रकारे भाडे तत्त्वावर देण्यात आलेल्या आहेत, त्यांनाच लागू राहतील. ही योजना १ एप्रिल २०२४ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीसाठीच लागू राहील. नझूल जमिनीच्या निवासी प्रयोजनार्थ प्रिमियम/ लिलावाद्वारे अथव अन्यप्रकारे भाडे तत्त्वावर दिलेल्या आहेत, त्यांना फ्री होल्ड करणे (भोगवटदार -१) करण्याकरिता अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर वितरणपत्रातील येणाऱ्या बाजारमूल्याच्या २ टक्के एवढे अधिमूल्य आकारण्यात यावे. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

लोकशाही वार्ता

# गोंदिया

नागपूर, शनिवार, ६ जुलै २०२४/११

लोकशाही वार्ता
जिल्हा कार्यालय, गोंदिया
जिल्हा प्रतिनिधी : जयंत शुक्ला
पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट गोंदिया
संपर्क क्र ९८२२३८६९९९

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta





## शिवीगाळ करून मारहाण

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

आमगाव पोलिस ठाण्यांतर्गत सुपलीपार येथे शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना ३० जून रोजी घडली. फिर्यादी महेंद्र मोडकू वाढई (४०) रा. सुपलीपार हे घरी असताना आरोपी धनीराम वाढई व अनिल वाढई यांनी घरी येऊन कुंपणावरून वाद निर्माण केला तसेच लाकडी पाट्याने मारून फिर्यादीला जखमी केले. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास आमगाव पोलिस करीत आहेत.

## दृष्टिक्षेप

### माजी मंत्री बडोले यांनी जखमींना दिला मदतीचा हात



**अर्जुनी मोर.** : माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक मंत्री ईंजी.राजकुमार बडोले हे सडक/अर्जुनी वरून अर्जुनी मोरगाव ला बैठकीला जात असतांना वाटेत ग्राम कनेरी जवळ रस्त्यावर मोटार सायकलने अपघात झालेले दोन तरुण जखमी अवस्थेत आढळून आल्याचे लक्षात येताच लगेच गाडी थांबवून जखमींची आस्थेने विचारपूस करुन लगेच दवाखान्यात फोन करुन रुग्णवाहिका बोलावून जखमी तरुणांना रुग्णालयात हलविले. सदर तरुण अर्जुनी मोर तालुक्यातील धाबेपवनी येथील असल्याचे समजते.

### दोन दुचाकी लंपास

**गोंदिया** : शहर पोलिस ठाण्यातर्गत गुजराती समाजवाडी जवळून अज्ञात चोरट्यांनी दोन दुचाकी लंपास केल्याची घटना २ जुलै रोजी उघडकीस आली. दुचाकी क्र.एमएच-३५/एएस-६४९० व दुचाकी क्र.एमएच-३५/एसी-२१११ गुजराती समाजवाडीजवळ ठेवल्या असता अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्या. फिर्यादी कमल राधेश्याम पुरोहित याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### खुली बुद्धिबळ स्पर्धा आजपासून

**गोंदिया** : जिल्हा बुद्धीबळ असोसिएशनच्या वतीने स्व.रमेश कोतवाल यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ६ जुलैपासून ऑल इंडिया रॅपिड बुद्धीबळ स्पर्धेचे आयोजन भवभूती रंगमंदिर येथे करण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत लीग पद्धतीने सामने होणार आहेत. या स्पर्धेला आंतरराष्ट्रीय मान्यता आहे. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना प्रथम पुरस्कार २१ हजार, द्वितीय ११ हजार, तृतीय ५ हजार, चतुर्थ ३ हजार आणि स्मृतिचिन्ह तसेच प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. प्रवेश व अधिक माहितीसाठी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क करावे, असे सचिव मुकेश बाराई यांनी कळविले आहे.

### कुंपणावरून वाद

**गोंदिया** : तिरोडा पोलिस ठाण्यातर्गत गराडा येथे कुंपणावरून वाद निर्माण झाल्याने आरोपीने फिर्यादीला मारहाण करून जखमी केल्याची घटना २ जुलै रोजीची आहे. फिर्यादी सिलवर कुकडू उके रा.गराडा याची पत्नी घरी असताना आरोपी रोहित रंगारी याने कुंपणावरून वाद निर्माण केला. तसेच फिर्यादी व त्याच्या पत्नीला शिवीगाळ करून मारहाण केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

### मुद्देमाल लंपास

**गोंदिया** : दवनीवाडा पोलिस ठाण्यांतर्गत महालगाव येथे दुकान फोडून अज्ञात चोरट्यांनी २० हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना १ जुलै रोजी उघडकीस आली. फिर्यादी मनोज पुरुषोत्तम नागपुरे यांच्या दुकानाचे शटर तोडून दुकानातील साहित्य व रोख असा एकूण २० हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# ‘माझी लाडकी बहीण’ योजनेचे एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये - पंकज रहांगडाले

## सडक अर्जुनी पंचायत समिती सभागृहात घेतला विविध विषयांचा आढावा




**लोकशाही वार्ता / सडक अर्जुनी**

राज्य शासनाच्या वतीने महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना ' राबविण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करून एकही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये याची दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले.

५ जुलै रोजी सडक अर्जुनी येथे पंचायत समितीच्या सभागृहात विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी आयोजित केलेल्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

### जिल्हा परिषद क्षेत्रनिहाय किमान १० शाळा अंगणवाडी मॉडेल करा

सडक अर्जुनी तालुक्यातील ५ जिल्हा परिषद क्षेत्रातील १० पंचायत समिती गणातील प्रत्येक जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्यांनी किमान १० शाळा व अंगणवाडीना भेटी देऊन मूलभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करावे व किमान १० शाळा व अंगणवाडी मॉडेल करावे, असे आवाहनही त्यांनी उपस्थित जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांना केले.

यावेळी मंचावर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणवीर, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सविता पुराम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, पंचायत समिती सभापती संगीता खोब्रागडे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. भुमेस्वर पटले, जिल्हा परिषद सदस्य कविता रंगारी, निशा तोडसाम, ललिता डोंगरवार, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंदराव पिंगळे, पंचायत समिती उपसभापती शालिंदर कापगते, पंचायत समिती सदस्य चेतन वडगाये, डॉ. वाढई, आदी उपस्थित होते. यावेळी पंचायत समिती स्तरावरील सर्वच विभागाचा आढावा घेण्यात आला.

शासनाच्या वतीने वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना राबविण्यात येत आहेत. मात्र, त्यांचा लाभ सामान्य नागरिकांना मिळत नसल्याने ते लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे आता सर्वांना लाभ कसा दिला जाईल, याचे नियोजन करून शासनाच्या योजना सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीसाठी कुणीही पैशाची मागणी केली किंवा अडवणूक केली तर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी जनार्दन खोटरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण संजय गणवीर, कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग राऊत, सहाय्यक गटविकास अधिकारी खोटेले यांच्यासह विविध विभागाचे विभागप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी सानप यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी (आरोग्य) शेंडे यांनी तर आभाप्रदर्शन अधीक्षक जयंत खोटेले यांनी केले.

# सौंदड तलावाचा होणार कायापालट

## सरपंच हर्ष मोदींच्या प्रयत्नांना मिळणार यश

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

सडक अर्जुनी तालुक्यातील सौंदड येथील तलावाला पर्यटनाचा दर्जा मिळावा, यासाठी सरपंच हर्ष मोदी यांनी शासनाकडे केलेल्या प्रयत्नाला यश मिळणाचा मार्ग मोकळा होणार असून तलावाचा लवकरच कायापालट होणार आहे.

सध्या मुंबई येथे पावसाळी अधिवेशनाला सरू आहे. या अधिवेशनादरम्यान सौंदडचे सरपंच हर्ष मोदी यांनी वन व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेऊन सौंदड येथील तलावाला पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत चर्चा केली व निवेदन सादर केले. प्रसंगी मुनगंटीवार यांनी सकारात्मक भूमिका घेत पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांना पुढील कारवाईसाठी पत्र सादर केले. गिरीश महाजन यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ कारवाईसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

त्यामुळे सौंदड तलावाचा लवकरच कायापालट होणार



आहे. यासाठी सरपंच हर्ष मोदी यांनी माजीमंत्री राजकुमार बडोले, आ. परिणय फुके, विरेंद्र अंजनकर, आ. विनोद अग्रवाल यांनी सहकार्य केले. याबद्दल हर्ष मोदी यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहे.

# उज्ज्वल मेश्राम हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक करा

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

शहरातील कुंभारेनगरात जुन्या वैमनस्यातून उज्ज्वल मेश्राम या १७ वर्षीय युवकाची धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याची घटना १८ जून रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास घडली होती. या प्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. मात्र, हत्या घडवून आणणारा मुख्य आरोपी मोकाटच असून पोलिस त्याला हाताशी घालत असल्याचा आरोप मृतक उज्ज्वलच्या कुटुंबीयांनी केला असून मुख्य आरोपीस तत्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी ५ जुलै रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत मागणीचे निवेदन केंद्र, राज्य शासनाला



### उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

पाठविले आहे.

उज्ज्वल मेश्राम हत्या प्रकरणातील आरोपी अंकीत गुर्वे याला पोलिसांनी ताब्यात घेतले. अंकीत याने हत्या प्रकरण्यातील सोबती राहूल शेंडे, हर्ष, प्रणय नागदेवे, साहील गवरे, हितेश भिमटे, गोलू ऊर्फ मोळा मुरली यादव यांचे नाव सांगितले. या आरोपींनी उज्ज्वलच्या हत्येची सुपारी घेतल्याचे सांगून मुख्य आरोपी कल्लू यादव याचे नाव घेतले. कल्लूवर काही महिन्यांपूर्वी झालेल्या गोळीबारात उज्ज्वलचा काका प्रशांत याचा हात असून वचपा काढण्यासाठी सुपारी दिल्याचा आरोप मेश्राम कुटुंबीयांनी निवेदनातून केला आहे. आरोपींला राजकीय पाठबळ असल्यामुळे पोलिस आरोपींला पाठीशी घालत आहेत. उज्ज्वलच्या खूनीला अटक करून कठोर शिक्षा करावी, या मागणीसाठी आज मोर्चा काढला. दरम्यानवरील मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत राष्ट्रपती, केंद्रीय गृहमंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, लोकायुक्त, मानवाधिकार आयोग, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक, जिल्हाधिकारी यांना पाठविले आहे.

# मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात प्रवेशाकरिता अर्ज आमंत्रित

**गोंदिया** : जिल्ह्यातील सर्व इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवगार्तील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मागासवर्गीय मुला-मुलींचे शासकीय वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना सर्व सोई-सुविधा मोफत पुरविण्यात येतात. सन २०२४-२५ करीता गोंदिया जिल्ह्यातील स्थानिक वसतिगृहामध्ये उच्च शिक्षण अभ्यासक्रम प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांनी अर्ज भरून आवश्यक त्या कागदपत्रासह सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, पंतगा मैदान, गोंदिया येथे १ जुलै ते २१ जुलैपर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद मोहतुरे यांनी केले आहे.

# त्या पोलिस शिपायावर शासकीय इंतमामात अंत्यसंस्कार

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ वर गस्त घालण्यासाठी निघालेल्या महामार्ग पोलिसांच्या वाहनाला ट्रकने जबर धडक दिली. या घटनेत मनीष बहेलिया या पोलिस शिपायाचा मृत्यू झाला तर दोन पोलिस शिपाई जखमी झाले. कर्तव्य दरम्यान अपघाती मृत्यू पावलेल्या पोलिस शिपाई मनीष बहेलिया याच्या पार्थिवावर गोंदिया येथे शासकीय इंतमामात अंत्यसंस्कार करण्यात



आले.

सडक अर्जुनी तालुक्यातील महामार्ग पोलिस डोंगरगाव येथे कर्तव्यावर असलेले मनीष वैष्ठलाश बहेलिया, पोउपनि दिनेश लिल्हारे, पोना योगेश बनोठे हे वाहन क्र.एमएच-१२/आरटी-९६१५ ने वाहतूक सुरक्षित करण्यासाठी गस्त घालत होते. मासुलकसा घाट जवळ ट्रक क्र.सीजी-०८/एके-१४०२ च्या चालकाने लापरवाहीने चालवून व मद्यधुंदीत पोलिस वाहनाला जबर धडक दिली. दरम्यान पोलिस वाहनात मागे बसलेले पोलिस शिपाई मनीष बहेलियासह तिघे जण जखमी झाले. जखमीला उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, मनिष बहेलिया याचा मृत्यू झाला. कर्तव्यावर असलेल्या पोशि मनीष बहेलिया याचा मृत्यू झाल्याने आज गोंदिया येथे शासकीय इंतमामात त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. गोंदिया पोलिसांनी हवेत गोळी झाडून शहीद पोलिस शिपायाला श्रध्दांजली दिली. यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थित आप्तेष्ठितांनी शहीद जवानाला श्रध्दांजली वाहिली.

# तहसील कार्यालयात अस्वच्छतेचा कहर

## दुर्गंधीने नागरिक त्रस्त; अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**लोकशाही वार्ता / आमगाव**

स्थानिक तहसील कार्यालयाला अस्वच्छतेचे ग्रहण लागले आहे. त्यामुळे कार्यालय आवारात घाणच घाण दिसून येत आहे. येथील शौचालय, मुत्रीघर तर घाणीचे बरबटले आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाजासाठी आलेल्या नागरिकांना श्वास घेणेही कठीण होऊन बसले आहे. असे असले तरी कार्यालयातील अधिकारी मात्र, याकडे दुर्लक्ष करीत आहे. यामुळे नागरिकांची कोंडी होऊन संताप व्यक्त केला जात आहे.

आमगाव तहसील कार्यालयात



तालुक्यातील गावागावातून दररोज शेकडो नागरिक कामकाजांसाठी येतात. त्यामुळे येथे सोयी-सुविधा असणे आवश्यक आहे. परंतु, येथील तहसील कार्यालय घाणीच्या विळख्यात सापडले आहे. कार्यालयातील स्वच्छतागृह, शौचालय घाणीचे बरबटले आहे. यामुळे कार्यालया परिसरात दुर्गंधी निर्माण झाली आहे. नागरिकांना श्वास घेणेही कठीण होऊन बसले आहे. हा प्रकार सुरू असतानाही अधिकारी मात्र सोयिस्कर दुर्लक्ष करीत आहेत. यामुळे नागरिक संताप व्यक्त करीत आहे. कार्यालयात अस्वच्छता निर्माण होऊनही लक्ष देत नसल्याने अधिकाऱ्यांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शौचालयांची स्वच्छता करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### शौचासाठी उघड्यावर

शासनाकडून स्वच्छ भारत मिशन अभियान राबविले जात आहे. यासाठी घरोघरी शौचालय निर्मितीवर भर देण्यात आला. उघड्यावर शौचास जाणे टाळावे, यासाठी नागरिकांवर कारवाईचा बडगाही उगारण्यात आला. तर दुसरीकडे तहसील कार्यालयातील शौचालय घाणीने पूर्णतः बरबटल्याने वापरयोग्य नाहीत. त्यामुळे कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी खुद्द उघड्यावर शौचास जात असल्याचे चित्र आहे. यामुळे शासकीय यंत्रणेचा कारभार चर्चेत आला आहे. नागरिकांना स्वच्छतेचे ज्ञान देणारे अधिकारीच स्वच्छतेला घेवून अज्ञानी कसे? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

# हृदयविकाराच्या धक्क्याने पोलिस अंमलदार वनवे यांचे निधन

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

मोटार परिवहन विभागातील पोलिस अंमलदार शैलेष वनवे यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. ही घटना ४ जुलैची आहे. वनवे हे पोलिस मुख्यालय गोंदिया येथे कार्यरत होते. कर्तव्यावर असताना अचानक प्रकृती खालावून त्यांना हृदयविकाराचा धक्का बसला.



गोंदिया येथील पोलिस मुख्यालयात कार्यरत शैलेष वनवे हे मोटार परिवहन विभागातील पोलिस अंमलदार होते. ४ जुलै रोजी कर्तव्यावर असताना शासकीय कामानिमित्त सालेकसा येथे गेले होते. दरम्यान त्यांना हृदयविकाराचा झटका आला. उपचाराकरीता सालेकसा ग्रामीण रुग्णालयात हलविले असता त्यांची प्राणज्योत मालवली गेली. त्यांच्या निधनाने पोलिस विभागावर शोककळा पसरली आहे. विशेष म्हणजे, सलग दोन दिवसात दोन पोलिस कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. काल, कर्तव्यावर असलेले मनीष बहेलिया (४०) रा.गोंदिया याचा अपघातात तर ४ जुलै रोजी शैलेष वनवे यांचा हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले.

# महिलांचे सशक्तीकरण व आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने सरकारचे महत्त्वपूर्ण पाऊल - राजेंद्र जैन

**लोकशाही वार्ता / गोंदिया**

आज गोंदिया शहर व ग्रामीण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक राष्ट्रवादी काँग्रेस भवन, गोंदिया येथे माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष प्रेमकुमार रहांगडाले यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. पक्षाची विचारधारा व पक्ष संघटन मजबूत करणे, महिलांचे सशक्तीकरण, स्वावलंबनासाठी मुख्यमंत्री-माझी लाडली बहीन योजना, शेतकऱ्यांचे कृषी वीज बिल माफ करणे, शेतकऱ्यांच्या दूध दराला प्रति लिटर ५ रु अनुदान, महिलांना पींक इ-रिक्षाचे वाटप, मुलींना निशुल्क उच्च शिक्षण सहित अनेक महायुती सरकारचे जनहितार्थ




निर्णय जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य करावे यावर माजी आमदार राजेंद्र जैन यांनी संबोधित केले.

नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्र शासनातर्फे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली. महिलांचे आर्थिक सशक्तिकरण, स्वावलंबन व आत्मनिर्भर करण्यासाठी जुलै २०२४ पासून दर महिन्यांला १५०० रु. तसेच महिलांच्या सक्षमीकरणाकरिता अनेक योजना जाहीर केल्याने गोंदिया जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस वतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व खासदार प्रफुल पटेलजी यांचे आभार मानले.

आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरण्याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस भवन, रेलटोली कार्यालय, गोंदिया येथे माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या उपस्थितीत पात्र लाभार्थी महिलांचे अर्ज भरून सहाय्यता केंद्र सुरू करण्यात आले व दररोज लाभार्थ्यांचे अर्ज भरण्यात येईल.

सर्वश्री राजेंद्र जैन, प्रेमकुमार रहांगडाले, बाळकृष्ण पटले, कुंदन कटारे, नानू मुदलियार, माधुरी नासरे, केतन तुरकर, मोहन पटले, अखिलेश शेठ, नीरज उपवंशी, शंकरलाल टेंभरे, रवीकुमार पटले, मनोहर वालदे, शिवलाल जमरे, विनीत सहारे, राजेश जमरे, चंदन गजभिये, नितीन टेंभरे, करण टेकाम, रमेश गौतम, विजेंद्र जैन, आशा पाटील, कीर्ती पटले, रुचिता चव्हाण, शर्मिला पाल, अनिता जैतवार, पुस्तकला माने, मोनिका सोनवाने, मदन चिखलोंडे, रमेश कुरील, लिकेश चिखलोंडे, हर्षवर्धन मेश्राम, राधेश्याम पटले, टी.एम.पटले, चंद्रकुमार चुटे, एकनाथ वहिले, संजीव राय, राज शुक्ला, संजय राऊत, प्रदीप रोकडे, हितेश पतेह, पवन पटले, पन्नालाल डहारे, नागो बनसोड, अनुज जायसवाल, गोविंद लिचडे, श्रावण ठकरांनी, हरिराम आसवानी, पंकज चौधरी, योगेश पतेह, अनिल खरोले, दिलीप डोंगरे, विजेंद्र बोरकर, सुरेश चुटे, प्रमोद कोसरकर, सुनील पटले, शैलेश वासनिक, आरजू मेश्राम, कपिल बावनथडे, कान्हा बघेले, खुशाल कटरे, राहुल गजबे, डी, एम पाटील, दर्पण वानखेडे, शौरभ मिश्रा, मंगेश रंगारी, श्रेयस खोब्रागडे, कुणाल बावनथडे, रवींद्र किसने, कमलेश मेश्राम, वामन गेडाम सहित मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

## सर्च रुग्णालयात मूत्रविकार व त्वचाविकार शिबिर

**गडचिरोली :** धानोरा तालुक्यातील चातगाव येथील सर्च रुग्णालयात १० जुलै रोजी मूत्रविकार व त्वचाविकार ओपीडीचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेषज्ञ ओपीडी करीता दत्ता मेघे हॉस्पिटल सावंगी, वर्धा येथील विशेषज्ञ सर्च रुग्णालय चातगाव येथे रुग्णसेवा देण्याकरिता येणार आहेत. मूत्रविकार ओपीडीमध्ये मूत्राशयाचा कर्करोग, अंडाशयावर सूज, किडनी स्टोन, मूत्राशय पिशवीमध्ये स्टोन असणे, लघवीची नळी चिपकलेली असणे, मूत्राशय नळीमध्ये स्टोन अटकलेला असणे, प्रोटेस्ट ग्रंथीची वाढ होणे तसेच लघवीतून रक्त जाणे, लघवी अटकत/ थांबत येणे अशी लक्षणे असल्यास मूत्रविकार तज्ज्ञांचे मार्गदर्शन व उपचार सुविधा उपलब्ध केली आहे.


गुड मॉर्निंग

लोकशाही वार्ता

# गडचिरोली

नागपूर, शनिवार, ६ जुलै २०२४/१२


## मुरूमगाव येथे दारूविक्री जोमात

**धानोरा :** तालुक्यातील मुरूमगाव येथे गावाच्या निर्णयाचे उल्लंघन करून अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी दारूबंदी समितीने पोलिस मदत केंद्राकडे निवेदनाद्वारे केली. याबाबतची तक्रार प्राप्त होताच पोलिसांनी दारूविक्रेत्याविरोधात मोहीम सुरू केली आहे. गाव संघटनेच्या महिलांनी संयुक्तरित्या मुरूमगाव पोलिस मदत केंद्राचे पोलिस उपनिरीक्षक एम.एम. शिरसाट यांना निवेदन दिले. यावेळी पोलिस पाटील चंदू ओरमडिया, पोलिस हवालदार कृष्णा उसेंडी, रामचंद्र सिंद्राम, सुधाकर नरोटे, पोलिस शिपाई निकेश मडकाम आदी उपस्थित होते.


epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta


दृष्टिक्षेप

## दुचाकी झाडाला आदळून एक ठार

**आष्टी:** खड्डा चुकविताना नियंत्रण सुटल्याने मोटार सायकल झाडावर आदळून एक जागीच ठार झाल्याची घटना मार्कंडा (कं) - घोट मार्गावरील बामनपेठ जवळील दासरवाही नाल्याजवळ शुक्रवार ५ जूलै रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. मानवेंद्र नरेंद्रनाथ रॉय वय (३८) रा. गांधीनगर असे मृत व्यक्तीचे नाव आहे. मानवेंद्र रॉय हे आपल्या एमएच ३३ एल ५७५१ क्रमांकाच्या दुचाकीने सकाळी ७:४५ वाजताच्या दरम्यान गांधीनगर येथून घरून आपल्या मुलास आष्टीजवळील तारसा येथील कारमेल अकाडमीला सोडून परत गावाकडे येत असताना बामनपेठ जवळील दासरवाही नाल्याजवळ खड्डे चुकविताना नियंत्रण सुटल्याने सरळ मोटारसायकल झाडाला आदळून मानवेंद्र हे जागीच ठार झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, १ मुलगी, पत्नी असा आप्तपरिवार आहे.

## किशोरवयीन मुलींना आरोग्याचे धडे

**गडचिरोली:** आधारविश्व फाउंडेशन गडचिरोलीच्या वतीने शहरातील गणेशनगरामधील शिवाजी शाळेजवळील गणेश मंदिरात किशोरवयीन मुलीं तसेच महिलांसाठी कार्यशाळा पार पडली. यावेळी किशोरवयीन मुलींना आरोग्यविषय मार्गदर्शन करून सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले. विविध सामाजिक कार्यात पुढाकार असलेल्या आधारविश्व फाउंडेशनच्या वतीने महिला व मुलींच्या आरोग्याबाबत कार्यशाळा घेतली. यावेळी १३ ते १८ वयोगटातील मुली उपस्थित होत्या. मुलींच्या हार्मोन्समध्ये बदल झाल्यामुळे शारीरिक तसेच मानसिक बदल होतात त्याविषयी त्या अनभिज्ञ असतात. तसेच या वयातील मुलींचे पालक म्हणून त्यांची काय भुमिका असायला पाहिले, याविषयी मार्गदर्शन केले.

# गडचिरोलीच्या समस्या सोडविण्यासाठी तातडीने उपाययोजना करा

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सचिव व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातील प्रलंबित असलेल्या समस्या सोडविण्यासाठी तातडीने उपाययोजना करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सचिव व जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

आमदार डॉ. देवराव होळी व आमदार कृष्णा गजबे यांच्या विनंती वरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनात गडचिरोली जिल्ह्यातील समस्या सोडविण्यासंदर्भात बैठकीचे आयोजन केले. या बैठकीमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी आमदारांनी उपस्थित केलेल्या सर्व विषयांना केंद्रित करून जिल्ह्यातील प्रलंबित समस्या जाणून घेत त्या तातडीने सोडवण्यासंदर्भात उपस्थित अधिकायांना निर्देश दिले. यावेळी विवीध विभागाचे सचिव, आरोग्य विभागाचे संचालक, गडचिरोलीचे जिल्हाधिकारी, उपमुख्यमंत्री यांचे सचिवसह वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.



बैठकीमध्ये जिल्ह्यातील गडचिरोलीच्या मेडिकल कॉलेजच्या संदर्भातील असणारे विविध प्रश्न. या शैक्षणिक सत्रापासून प्रवेश सुरू करणे व पीएमसीची नियुक्ती करावी. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे नवीन बांधकाम, पीएमसीची नियुक्ती करणे. गडचिरोली नवीन विमानतळाच्या निर्मिती संदर्भातील कार्यवाही करणे. गडचिरोली जिल्हा स्टेडियमचे संथ गतीने होणारे बांधकाम, दुसऱ्या टप्प्यातील अंदाजपत्रकास मंजुरी, पीएमसीची मान्यता व वन विभागाचे असणारे अतिक्रमण काढणे. भेंडाळा येथील राजीव गांधी उपसा सिंचन , वसा पोर्ला उपसा सिंचन योजना यांची पीएमसीच्यामार्फत निवीदा प्रक्रिया करून काम सुरू करणे, कोनसरी पोलाद प्रक्रियेत जमीन अधिग्रहण करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेणे व त्यांच्या मागणीनुसार जमिनीचा मोबदला देणे, गडचिरोली नगरपरिषद क्षेत्रांतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजना व वाढीव गटार लाईन योजनेच्या प्रलंबीत प्रस्तावांना मंजुरी देणे, धानोरा व चामोर्शी नगरपंचायत अंतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजनेला मंजुरी देणे, गडचिरोली, धानोरा व चामोर्शी तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील पंतप्रधान आवास योजनेच्या अंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल मिळण्यास होणाऱ्या अडचणी दूर करून त्याविषयीच्या उपाययोजना करणे, गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता १ व कार्यकारी अभियंता २ येथील बजेट मधील निधी कामानुसार वितरित करणे, गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नव्या बांधकामास मंजुरी देणे, जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय भवनांस मंजुरी देणे आदी समस्यांवर चर्चा करून त्या मार्गी लावण्याच्या सूचना केल्या.

यावेळी आ. डॉ. देवराव होळी यांनी गडचिरोली जिल्ह्यात नव्याने सर्किट हाऊस (विश्रामगृह) बांधकाम करणे, गडचिरोली, धानोरा व चामोर्शी नगर पंचायत समितीच्या प्रशासकीय भवनांना मंजुरी देणे, गडचिरोली जिल्ह्यामध्ये वाघ, हत्ती व इतर हिंसक वन्यप्राणामुळे मृत्यू झालेल्या परिवारांना आर्थिक भरपाई देणे व हिंसक वन्य प्राण्यांपासून मृत्यू टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणेबाबत, गडचिरोली जिल्ह्यातील ओबीसी विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहा संदर्भात असणाऱ्या समस्या दूर करणे आवश्यक असून या बैठकीच्या माध्यमातून त्या मार्गी लावाव्यात असेल अशी मागणी केली असता उपमुख्यमंत्र्यांनी या संदर्भात संबंधित विभागाला प्रत्येक कामाचा टाईम निर्धारित करून त्यानुसार कारवाई करावी असे निर्देश दिले.

# महिलांनी दारू विक्रेत्यास केले पोलिसांच्या स्वाधीन

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

चामोर्शी तालुक्यातील तळोधी (मो) या गावाला अवैध दारूविक्रीमुक्त करण्यासाठी महिलांनी शर्तीचे प्रयत्न सुरू केले आहे. त्यामुळे मागील पाच महिने गावातून अवैध दारू हद्दपार झाली होती. परंतु, गावातील काही विक्रेत्यांनी चोरट्या मार्गाने अवैध व्यवसाय सुरू केल्याची माहिती मिळताच मुक्तिपथ व गाव संघटनेच्या महिलांनी अहिंसक कृती करीत एका दारू विक्रेत्याकडून ५ हजार रुपये किमतीची देशी दारू जप्त करून पोलिसांच्या स्वाधीन केले.

तळोधी (मो) हे गाव मुख्यालयापासून १० किमी अंतरावर आहे. या ठिकाणी १५ ते २० दारू विक्रेते सर्रास दारू विक्री करीत होते. अवैध दारूविक्रीला कंटाळून महिलांनी ग्रामसभा घेऊन दारूविक्रीबंदीचा ठराव पारित केला. तसेच सर्व दारूविक्रेत्यांना नोटीस देऊन अवैध व्यवसाय तत्काळ बंद करण्याची तंबी देण्यात आली. यामुळे काही दारू विक्रेत्यांनी दारूविक्री बंद केली. परंतु काही मुजोर विक्रेत्यांनी आपला अवैध व्यवसाय सुरूच ठेवला. त्यामुळे गाव संघटनेने सात दारूविक्रेत्यांना पडकून पोलिसांच्या स्वाधीन केले. तरी काही विक्रेत्यांनी आपला व्यवसाय सुरूच ठेवला. यासंदर्भातील माहिती पोलिस अधीक्षक यांना निवेदनातून देण्यात आली असता संबंधित विक्रेत्यांवर सुद्धा कारवाई करण्यात आली. यामुळे सदर गाव गेल्या पाच महिन्यांपासून अवैध दारूविक्रीमुक्त झाला होता. अशातच गावातील एक विक्रेता चोरट्या मार्गाने दारूविक्री करीत असल्याची माहिती मिळताच महिलांनी दारूविक्रेत्यांविरोधात अहिंसक कृती करण्याचे नियोजन केले. त्यानुसार गाव संघटना व मुक्तिपथने संयुक्त कृती करीत सुनील भांडेकर या विक्रेत्याकडून ५ हजार रुपयाचे देशी टिल्लू पकडून पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. ही दारूबंदी कायम टिकवून ठेवण्यासाठी गाव संघटनेच्या महिलांकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. यावेळी गाव संघटनेच्या सदस्यांसह मुक्तीपथचे तालुका उपसंघटक आनंद सिडाम, स्पार्क कार्यकर्ती पल्लवी चुधरी उपस्थित होते.

# पात्र उमेदवाराला होमगार्ड सेवेत सामावून घ्या

## उमेदवारांचे माजी आ. गेडाम यांना साकडे

**लोकशाही वार्ता/ आरमोरी**

सन २०१७ मध्ये होमगार्ड भरतीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना सहा वर्षाचा कालावधी लोटूनही नियुक्तीपत्र देण्यात आले नाही. त्यामुळे जिल्ह्यातील ३१२ पात्र उमेदवार नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत. या पात्र उमेदवाराला होमगार्ड सेवेत सामावून घेण्यात यावे. यासाठी आपण पाठपुरावा करावा, अशी मागणी पात्र उमेदवारांनी माजी आ. आनंदराव गेडाम यांच्याकडे निवेदनातून केली आहे.

गडचिरोली जिल्हा समादेशक कार्यालयाकडून १९ जुन २०१७ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली येथील ग्राउंड वर एकूण ४१७ जागेसाठी होमगार्ड भरती घेण्यात आली होती. त्या भरतीमध्ये आरमोरी तालुक्यातील ८० जागेचा समावेश होता. त्यामध्ये पुरुषांसाठी ६५ व महिलांसाठी १५ अशा एकूण पात्र ८० उमेदवारांची यादी प्रकशीत करण्यात आली. संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यातील ४१७ जागांची यादी सुद्धा प्रकाशित करण्यात आली. परंतु जिल्हा समादेशक कार्यालय गडचिरोली यांनी प्रकाशित केलेल्या जाहिरातीनुसार ४९७ जागा भरणे अनिवार्य असतांना सुद्धा फक्त १०५ उमेदवारांना बोलावून नियुक्ती देण्यात आली. उर्वरित ३१२ उमेदवार आजतागायत नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत. आज ना उद्या नियुक्तीपत्र मिळेल या आशेवर पात्र उमेदवार होते. मात्र आजपर्यंत त्यांच्या पदरी निराशाच पडली. भरतीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना पाच सहा वर्ष उलटूनहीं होमगार्ड या पदावर घेण्यात आलेले नाही. जिल्ह्यात कोणताच मोठा उद्योग नाही, शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही. त्यामुळे गरीब कुटुंबातील युवक मेहनत करून होमगार्ड भरतीत सहभागी झाली. मात्र, पात्र होऊनही सदर पदावर नियुक्ती न मिळाल्याने पात्रता धारक उमेदवारांवर अन्याय करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष घालून सन २०१७ मधील पात्रता धारक उमेदवारांना होमगार्ड पदावर नियुक्ती देण्यात यावी. यासाठी आपण पाठपुरावा करावा, अशी मागणी जगदीश बुल्ले, हेमराज ठाकरे, महेश लाकडे, रवींद्र भोयर, लंकेश राऊत आदींनी केली आहे.

# कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांकरिता पीक स्पर्धेचे आयोजन

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

अन्नधान्य, कडधान्य व राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांचे मनोबल वाढून आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

कृषी विभागामार्फत खरीप हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, सुर्यफुल या ११ पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

### पीक स्पर्धेच्या बक्षिसांचे स्वरूप

| अ.क्र. | स्पर्धा पातळी | सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षीस रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | पहिले | दुसरे | तिसरे |
| १ | तालुका पातळी | ५००० | ३००० | २००० |
| २ | जिल्हा पातळी | १०००० | ७००० | ५००० |
| ३ | राज्य पातळी | ५०००० | ४०००० | ३०००० |

**पीक स्पर्धेची ठळक वैशिष्ट्ये व बाबी**

पीकस्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख मूग व उडीद पिकासाठी ३१ जुलै तसेच भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल या पिकांसाठी ३१ ऑगस्ट आहे. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र सर्वसाधारण गटासाठी रक्कम रूपये ३०० व आदिवासी गटासाठी रक्कम रूपये १५० स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल.

पीकस्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरिता स्पर्धकास स्वतःच्या शेतावर स्पर्धेकरिता सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या पिकाची भात पिकाच्या बाबतीत किमान २० आर व इतर पिकांच्या बाबतीत किमान ४० आर (१ एकर) क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. पीकस्पर्धा तालुकास्तरावर आयोजित करण्यात येणार असून सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पीकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे.

### अर्ज कोठे करावा व जोडावयाची कागदपत्रे

विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र अ), ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२, ८-अ चा उतारा, जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास), पीक स्पर्धेसाठी शेतकऱ्याने सबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा, बँक खाते चेक/ पासबुक पानाची प्रत.

तरी खरीप हंगाम सन २०२४ पीक स्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज मास्तोळी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कृषी विभाग महाराष्ट्र राज्य संकेतस्थळ www.krishi.maharashtra.gov.in किवा सबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# नागरिकांनी बँकिंग सुविधेचा लाभ घ्यावा -पोरेड्डीवार

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

गडचिरोली जिल्हा मध्यवती सहकारी बँकेने जिल्ह्यातील अतिदुर्गम भाग असलेल्या एटापल्ली तालुक्यातील हेडरी या गावांत शाखा सुरू करून अतिदुर्गम भागातील लोकांना बँकिंग सुविधा व डिजिटल सुविधा उपलब्ध करून हेडरी व परिसरातील लोकांनी बँकिंग सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बँकेचे अध्यक्ष प्रचित पोरेड्डीवार यांनी हेडरी येथे ग्राहकांकरिता आयोजित ग्राहक संवाद कार्यक्रमात केले.




गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नुकतेच अतिदुर्गम भाग असलेल्या हेडरी या गावांत बँकेच्या ५६ व्या शाखेचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. हेडरी येथे बँकेची शाखा सुरू झाल्यामुळे हेडरी व परिसरातील ४० गावातील लोकांना बँकेची अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहे. बँकेने येथे ग्राहकांकरीता ए.टी.एम., मोबाईल बँकींग, यूपीआय, क्यू आर कोड, आर.टी.जि.एस., एन ई. एफ.टी. व पासबुक प्रिंटिंग मशिनसारख्या अत्याधुनिक सुविधा ग्राहकांकरिता उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

बँकेने हेडरी व परिसरातील लोकांचे अडीअडचणी समजून घेण्याच्या दृष्टीने बँकेने ग्राहक संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी हेडरी व परिसरातील ग्राहक व लॉयड मेटल्स ॲन्ड एनजी लि. चे अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संवाद साधुन त्यांच्या अडी-अडचणी व त्यांनी केलेल्या सुचना जाणुन घेतल्या. कार्यक्रमाला लॉयड मेटल्स ॲन्ड एनजी लि. सुरजागड चे सहाय्यक संचालक अरुण कुमार रावत यांनी गडचिरोली जिल्हा बँकेचे शाखा सुरु झाल्यामुळे गावांतील लोकांसोबतच लॉयड मेटल्स ॲन्ड एनर्जी लि. चे असलेले अधिकारी व कर्मचारी यांना जिल्हा बँकेच्या अत्याधुनीक सुविधेचा लाभ होत असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश आयलवार यांनी केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून हेडरीचे सरपंच अरुणा शेडमेक, उपसरपंच राकेश कवडो, बँकेचे उपाध्यक्ष श्रीहरी भंडारी, हेडरी पोलिस स्टेशनचे प्रमुख सुनील दौंड, दत्तात्रय बाराते, लॉयड मेटल्स ॲन्ड एनर्जी लि. चे सहाय्यक संचालक साई कुमार, सत्या राव, दिलीप बुरांडे, सत्यवान कलसे, देऊ पुसु कवडो तसेच बँकेचे अधिकारी राजू सोरते, किरण सांबरे, हेडरी या शाखेचे शाखा व्यवस्थापक राजु मुहमवार, शरद भन्नारे व उपस्थित होते.

# मुरमाडी आश्रमशाळेत कायदेविषयक शिक्षण शिबिर

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांचे समान किमान कार्यक्रमांनुसार 'बालकांचे हक्क व बेटी बचाओ बेटी पढाओ' या विषयावर कार्यक्रम घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विकास कुलकर्णी यांचे आदेशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरणतर्फे तालुक्यातील मुरमाडी आश्रमशाळेत आज ५ जुलै रोजी कायदेविषयक शिक्षण शिबीर घेण्यात आले.

शिबिरास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव आर. आर. पाटील होते. सामाजिक कार्यकर्ते जयंत जथाडे, अध्यक्षस्थानी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक एच.एम. चुधरी उपस्थित होते. यावेळी जयंत जथाडे यांनी उपस्थित विद्यार्थी, विद्यार्थीनींना बालकोंच मूलभूत अधिकार, बाल विवाह, बाल कामगार याबाबत माहिती दिली. आर.आर. पाटील यांनी बालकांचे मुलभूत अधिकार व बेटी बचाओ बेटी पढओ, बालमजुरी, बालविवाह तसेच बालकांचे संविधानिक मुलभूत अधिकाराबाबत माहिती दिली. यावेळी मुख्याध्यापक चुधरी यांनीही मार्गदर्शन केले. संचालन व आभारप्रदर्शन नरूले यांनी केले. यशस्वीतेसाठी आश्रमशाळेचे शिक्षकवृद्ध, कर्मचारी, प्राधिकरणाचे कर्मचारी, एन. आर. भलमे, वरिष्ठ लिपिक एस.के. चुधरी, यांनी सहकार्य केले.

## वनश्री महाविद्यालयात वृक्षारोपण

**कोरची:** येथील वनश्री कला व विज्ञान महाविद्यालयात रासेयो विभागाद्वारा वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मनोज अग्रवाल, आशिष अग्रवाल, महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य तथा रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही. टी. चहारे, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. प्रदिप चापले, प्रा. आर. एस. रोटके, प्रा. एम डब्ल्यू रुखमोडे, प्रा. एस. एस.दोनाडकर उपस्थित होते.

# आकांक्षित तालुक्याचे निर्देशांक उंचाविण्यासाठी सामूहिक प्रयत्नाने कामे करा

## अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार : संपूर्णतः अभियानाचा प्रारंभ

**लोकशाही वार्ता/ गडचिरोली**

आकांक्षित तालुका कार्यक्रमातंर्गत शिक्षण, आरोग्य, कृषी, पोषण इत्यादी विविध विकास क्षेत्रातील निर्देशांक १०० टक्के पूर्तता पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणेने सामूहिक प्रयत्नातून कामे करण्याच्या सूचना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार यांनी गुरुवारी दिल्या.



निती आयोगामार्फत विशेष अभियानांतर्गत ४ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत आकांक्षित तालुक्यातील विविध विकास निर्देशांक उंचावण्यासाठी संपूर्णता अभियान राबविण्यात येत आहे. यात जिल्ह्यातील अहेरी, सिरोंच्या व भामरागड या तीन तालुक्यांचा समावेश आहे. गडचिरोली जिल्ह्यात या अभियानाचे उद्घाटन गुरुवार, ५ जुलै रोजी नियोजन भवन येथे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी भुयार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी निती आयोगाचे दिल्ली येथील विशेष प्रतिनिधी विनयकुमार हनवटे, जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक प्रशांत शिर्के, जिल्हा नियोजन अधिकारी श्रीराम पाचकवडे, सामान्य प्रशासनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कणसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज मास्तोडी, जिल्हा आरोग्य अधिकारी प्रताप शिंदे, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त डॉ. सचिन मडावी, कार्यकारी अभियंता दोरखंडे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी चेतन हीवंज, जिल्हा कृषी अधिकारी श्री तुमसरे प्रामुख्याने उपस्थित होते.

सर्व आकांक्षी तालूक्यात सहा प्रमुख सामाजिक क्षेत्रांच्या निर्देशकांची १०० टक्के पूर्तता प्राप्त करणे, हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. आकांक्षित तालुक्यात कोणीही लाभार्थी शासकीय योजनेपासून वंचित राहू नये व सर्व गावांना योजनेचा लाभ मिळावा अशा सूचना श्री भुयार यांनी पुढे बोलताना दिल्या. संपूर्णता अभियानांतर्गत स्मार्ट शाळा तयार करणे साठी आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करणे, आरोग्य यंत्रणेचे बळकटीकरण करणे, कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना योजनांचा लाभ देऊन सक्षम करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले

### ६ निर्देशांका लक्ष केंद्रित करण्यात येणार

गरोदरपणाच्या पहिल्या तिमाहीत प्रसूतीपूर्व काळजीसाठी नोंदणी केलेल्या गर्भवती महिलांची टक्केवारी. प्रभागातील लक्ष्यीत लोकसंख्येच्या तुलनेत मधुमेहासाठी तपासणी केलेल्या व्यक्तींची टक्केवारी. प्रभागातील लक्ष्यित लोकसंख्येच्या तुलनेत उच्च रक्तदाबासाठी तपासणी केलेल्या व्यक्तींची टक्केवारी. आयसीडीएस कार्यक्रमांतर्गत नियमितपणे पूरक पोषण आहार घेणाऱ्या गर्भवती महिलांची टक्केवारी. मृदा नमुना संकलन उद्दिष्टाच्या तुलनेत तयार करण्यात आलेल्या मृदा आरोग्य कार्डांची टक्केवारी. प्रभागातील एकूण बचत गटांच्या तुलनेत फिरते भांडवल मिळालेल्या बचत गटांची टक्केवारी.

जिल्हा आरोग्य अधिकारी शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मास्तोडी यांनी देखील यावेळी आरोग्य व कृषी विभागाच्या योजनांविषयी माहिती दिली. तर प्रशांत शिर्के यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील विविध लाभार्थ्यांना धनादेश, बी-बियाणे, माती तपासणी प्रमाणपत्र, बेबी केअर किट, विद्यार्थ्यांना पुस्तके व टॅब आदी लाभाचे वाटप करण्यात आले तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

सुरुवातीला आय.टी.आय. चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जनजागृतीपर रॅली काढण्यात आली.

# भेंडाळात ५५ जनावरांचे लसीकरण

**लोकशाही वार्ता/ भेंडाळा**

पावसाळ्याच्या दिवसात पशूंना निरनिराळे आजार होतात. जनावरांची रोगप्रतिकारशक्ती कमी होऊन दुधाळू जनावरांचे दूध देण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात जनावराचे लसीकरण करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख, कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत यशोदीप संस्था गडचिरोली सलंग्नित केवळरामजी हरडे कृषी महाविद्यालय चामोर्शी येथील कृषीदूतांनी भेंडाळा येथे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने पशु लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ५५ जनावरांचे लसीकरण करण्यात आले.

लसीकरणावेळी पशुवैद्यकीय अधिकारी अर्चना महाले प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी ईटीव्ही आणि एचएसव्ही ची लस पशुंना देण्यात आली.

पावसाळी रोगांपासूनचे कसे संरक्षण करता येईल याची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. तसेच गुणवत्ता पूर्ण चारा आपण जर पशुंना दिले तर नक्कीच त्यांच्या दुधात वाढ होते, असे मार्गदर्शन कृषीदूतांनी केले.

लसीकरणावेळी सुभाष मिस्त्री, मनोज वैरागडे, ईश्वर दास, विठ्ठल सातपुते, संजय चलाख, निखिल उंदीरवाडे, डॉ.बिधानजी मंडल, गुरुदेव डांगे आणि इतर गावातील शेतकरी व गावकरी उपस्थित होते. सदर प्रात्याक्षिक कार्यक्रम डॉ. प्राचार्य आदित्य कदम, प्रा.छबिल दुधबळे, प्रा.डॉ. रेखा समरित, प्रा. तुषार पाकवर, प्रा. तुषार भांडारकर, प्रा. भोजराज कुंमरे प्रा.निकिता येलमुले, प्रा. प्रलय झाडे व पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. श्रीकांत सरदार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

लोकशाही वार्ता
# वर्धा
गुड मॉर्निंग
नागपूर, शनिवार, ६ जुलै २०२४ / ९

## चोरट्याने कृषिपंप पळविला

**पुलगाव :** शेतातील विहिरीतील कृषिपंप चोरट्याने चोरून नेला. केळापूर शेतशिवारात ही घटना घडली. किशोर कृष्णराव गावंडे रा. हरिओमनगर सिंदी (मेघे) यांचे केळापूर शिवारात शेती असून शेतातील विहिरीवरील तीन अश्वशक्तीचा कृषिपंप मध्यरात्रीच्या सुमारास चोरून नेला.

या प्रकरणी सिंदी (मेघे) पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. चोरी गेलेल्या पंपाची किंमत २० हजार रुपये आहे. तक्रारीवरून पोलिसांनी घटनेची नोंद केली. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## गोंड गोवारी समाजाचे निवेदन स्वीकारण्याकरिता बैठक

**वर्धा :** गोंड गोवारी समाजाच्या निवेदनांवर अभ्यास करण्यासाठी उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश के.एल. वडणे यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार समिती गठीत करण्यात आली आहे.या समितीचे अध्यक्ष उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश के.एल.वडणे हे १५ व १६ जुलै रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत रविभवन, शासकीय विश्रामगृह नागपूर येथे नागपूर महसूल विभागातील गोंड गोवारी समाजाच्या संघटेच्या प्रतिनिधींचे निवेदन स्विकारणार आहे. यासाठी इच्छुक गोंड गोवारी समाजाच्या प्रतिनिधींनी आपले संक्षिप्त लेखी निवेदन टंकलिखीत व वाचनीय असलेले निवेदन सादर करावे.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

### दृष्टिक्षेप

## पोलिस शिपाई पदास पात्र उमेदवारांची रविवारी लेखी परीक्षा

**वर्धा :** सन २०२२-२०२३ पोलीस शिपाई भरती प्रक्रियेमध्ये पोलिस शिपाई पदासाठी पोलिस अधीक्षक वर्धा या घटकात लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या २०६ उमेदवारांची लेखी परीक्षा ७ जुलै रोजी सकाळी ९ ते १०.३० वाजता दरम्यान घेण्यात येणार आहे.

ही परीक्षा दत्ता मेघे हायर एज्यूकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट एक्झामिनेशन हॉल सावंगी (मेघे) येथे घेण्यात येणार आहे.

पोलीस शिपाई पदासाठी लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहे.

उमेदवारांनी सदर परीक्षा केंद्रावर ७ जुलै रोजी सकाळी ६.३० वाजता लेखी परीक्षेसाठी हजर राहावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पिपरी प्लस व १३ गावांचा पाणीपुरवठा योजनेचे पुनर्जीवन करण्याची आ. भोयर यांची मागणी

## पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांना दिले निवेदन, प्रस्ताव सादर करण्याचे मंत्र्यांचे आदेश

**लोकशाही वार्ता/वर्धा**

शहरालगत असलेल्या पिपरी व अन्य तेरा गावांसाठी असलेली पाणीपुरवठा योजना वाढत्या नागरिकीकरणामुळे अपुरी पडत आहे. त्यामुळे या योजनेचे पुनर्जीवन करण्यात यावे, अशी मागणी गुरुवारी आ. डॉ. पंकज भोयर यांनी राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे केली. आ. भोयर यांच्या मागणीची तातडीने दखल घेत पाटील यांनी मजिप्राचे सदस्य सचिव यांना तत्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहे.



आ. डॉ. पंकज भोयर यांनी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांना दिलेल्या निवेदनातून पिपरी प्लस तेरा गावे या योजनेच्या वर्तमान स्थिति कडे लक्ष वेधले. वर्धा ऐतिहासिक शहर असुन शहराच्या सीमा लहान असलेल्याने लगतच्या परिसरात झपाट्याने नागरिकीकरण मागील काही वर्षात झाले आहे. मात्र, या भागात पाणीपुरवठ्याची सोय नसल्याने दरवर्षी भीषण पाणी टंचाई निर्माण होत असल्याने सन २००५ मध्ये सरकारने पिपरी प्लस १० गावे ही पाणीपुरवठा योजना मंजूर केली. मजिप्रा ने योजनेतंर्गतची कामे पूर्ण करून एप्रिल २००९ कार्यान्वित करण्यात आली. या योजनेमध्ये पिपरी, सिंदी मेघे, साटोडा,आलोडी,सावंगी, नालवाडी, म्हसाळा, वरूड, बोरगाव, कारला, वायगांव निपाणी आदि गावांचा समावेश होता. मात्र, यानंतर योजनेमध्ये उमरी, सालोड व दत्तपूर ही गावे नव्याने जोडण्यात आली. त्यामुळे पिपरी प्लस १३ गावे झाली. आज या योजनेला १५ वर्षांचा कालीवधी लोटला आहे. तथापि, मूळ योजनेतील जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता संपली आहे. वर्तमान स्थितीत १४ गावांना दोन दिवसाआड पाणीपुरवठा होतो. यावरून जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता अपुरी पडत असल्याचे दिसून येते. या योजनेवर नियंत्रण ठेवण्याची स्वंतत्र कार्यालयाची देखील गरज निर्माण झाली आहे. शासनाने जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद मार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पूर्वपरवानगी न घेता १४ गावांतहल ग्रा.पं. क्षेत्रात अतांत्रिकरित्या अंदाजे १६ हजार नळ जोडण्या जोडलयामुळे योजनेवर त्याचा ताण पडून डबघाईस आली आहे. परिणामी भविष्यात मोठे संकट निर्माण होऊ शकते. शहरालगतच्या ग्रा.पं. क्षेत्रात नागरिकीकरणाचा वेग अधिक असल्याने योजनेवरचा ताण आणखी वाढत जाणार आहे. परिणामी जलसंकट निर्माण होण्याची शक्यता आहे. सध्या या गावांना प्रती माणसीप्रति ७० लीटर पाणी देण्यात येते. हा निकषदेखील बदलविण्याची गरज आहे. त्यामुळे वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे. सदर योजनेचे पुनरुज्जीवन करण्यात यावे, अशी मागणी आ. डॉ. पंकज भोयर यांनी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे केली आहे.

यावेळी आ. भोयर यांनी वर्धा व सेलू तालुक्यात सुरू असलेल्या जल जिवन मिशन योजनेची कामे तातडीने पुर्ण करण्यासंदर्भांत संबंधितांना सूचना देण्यात याव्या तसेच वर्धा शहरातील अमृत योजनेतंर्गत सुरू असलेल्या भूमीगत पाणीपुरवठा व मल निस्सारण योजनेचा आढावा घेण्यात यावा, अशी मागणी केली.

# साथरोगाबाबत कार्यशाळा घेण्याचे सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना आदेश

**लोकशाही वार्ता/वर्धा**

पावसाळ्यात उद्भवणा-या विविध आजारासंबंधी जनजागृती करण्याकरिता प्राथमिक आरोग्य केंद्रांना साथरोगाबाबत कार्यशाळा घेण्यासंबंधित आदेश जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी निर्गमित केले आहे.

पावसाळा हा विविध आजारांना निमंत्रण देणारा ऋतु म्हणून ओळखला जातो. पावसाळ्यात हवेतील आद्रतेमुळे विषाणू वाढतात त्यामुळे पाणी, अन्न पदार्थ दूषित होण्याची शक्यता असते. तसेच गढूळ पाणी, पाला पाचोळा कुजल्यामुळे डासासह विविध प्रकारचे जीवाणू सुध्दा निर्माण होतात. त्यामुळे पावसाळ्यात साचलेल्या पाण्यामुळे किटकजन्य आजार डेंगु, काविळ, हिवताप, चिकुण गुण्यासारखे आजार तसेच दूषित पाण्यामुळे कॉलरा, अतिसार, काविळ, विषमज्वर यासारखे आजार उद्भवतात. तसेच पावसाळ्यामध्ये लेप्टोस्पायरा या जंतूची जखमेवाटे लागण होवून लेप्टोस्पायरोसी हा आजार होतो. या सर्व आजाराची लागण होऊ नये म्हणुन यासाठी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांनी साथरोगाबाबत कार्यशाळा घेऊन उपाय योजना करण्याबाबत उपाययोजना कराव्यात असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

गावाला पाण्याचा पुरवठा होणाऱ्या पाईपलाईनला गळती होत असल्यास किंवा व्हॉल लिकीज असल्यास तात्काळ दुरुस्ती करावी. सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीची स्वच्छता करण्यात यावी. तसेच पाणी शुध्दीकरण केल्यानंतर अर्ध्या तासाने ओटी टेस्ट करावी. ओटी टेस्ट पॉझीटीव्ह आल्यास पाणीपुरवठा करावा. ग्रामपंचायत मध्ये ३ महिने पुरेल एवढा ब्लिचिंगसाठा उपलब्ध असावा.

पावसाळ्यात गावातील नाल्या साफ करून वाहती करणे, पावसाचे पाणी साचत असेल तेथील पाणी वाहते करणे, गप्पी मासे सोडणे, गावातील परिसर स्वच्छ ठेवणे, आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळणे, उघड्यावरील अन्नपदार्थ खावू नये, आरोग्य कर्मचारी यांनी दैनंदिन सर्व्हेक्षण करून तापाचे रुग्ण शोधणे, अतिसार रुग्णाच्या नोंदी ठेवणे इत्यादी उपाययोजना बाबत कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहे.

**आरोग्य विभागाकडून पथकांची नियुक्ती**

साथरोगाला वेळीच प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना राबवितायाव्या याकरीता तालुकास्तर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर वैद्यकिय मदत पथकांची स्थापना करण्यात आली असून साथरोगासंबंधी वेळेवर माहिती मिळण्याकरीता साथरोग नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. पावसाळ्यात साथीचे आजार उद्भवू नये यासाठी प्राथमिक आरोग केंद्र स्तरावर सरपंच, ग्रामसेवक, जलसुरक्षक व आरोग्य कर्मचारी यांची किटकजन्य व जलजन्य साथीच्या आजाराबाबत कार्यशाळा घेऊन जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात यावे. यामुळे साथीच्या आजारांना आळा घालता येईल, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केले आहे.

# सिंदी परिसरात ६१० ग्रॅम गांजा जप्त

**लोकशाही वार्ता/वर्धा**

सिंदी (रेल्वे) पोलिस ठाण्याच्या हद्दीत ६१० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या चमूने ही कारवाई केली.



सिंदी (रेल्वे) पोलिस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या चमूकडून अवैध धंद्यांवर कारवाईकरीता पेट्रोलिंग सुरू होती. मुखबीरकडून मिळालेल्या गोपनिय माहितीवरून आरोपी अजिज गुलाब शहा (वय ४८), रा. सिंदी (रेल्वे) याच्यावर एनडीपीएस कायद्यान्वये छापा टाकला. अजिज शाहा याच्या ताब्यातून राहत्या घरून ६१० ग्रॅम गांजा, एक इलेक्ट्रिक वजन काटा, मोबाईल असा २३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आला. चौकशीदरम्यान नागपूर येथील एका व्यक्तीने पंधरा दिवसांपूर्वी गांजा आणून दिल्याची माहिती पुढे आली. पोलिसांनी दोन आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक नूरुल हसन, अपर पोलिस अधीक्षक डॉ. सागर कवडे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक संजय गायकवाड यांच्या निर्देशाप्रमाणे पोलिस उपनिरीक्षक अमोल लगड, पोलीस अंमलदार चंद्रकांत बुरंगे, सचिन इंगोले, प्रमोद पिसे, महादेव सानप, पवन पन्नासे, रामकिसन ईप्पर, मनीष कांबळे, अरविंद इंगोले, गजानन दरणे यांनी केली.

**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

# दोन महिन्यांपासून पसार असलेले अट्टल गुन्हेगार ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लोकशाही वार्ता/वर्धा**

मागील दोन महिन्यांपासून पसार असलेले अट्टल गुन्हेगार असलेले मुख्य आरोपी व त्याच्या साथीदारास पोलिसांनी ताब्यात घेतले. दोघांनाही पोलिसांनी पुण्यातून ताब्यात घेत अटक केली.



फिर्यादी हा त्याचा मित्राचा बर्थडे पार्टीमध्ये आला असता आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवून काही कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ करून मारहाण केली. त्या ठिकाणी ठेवून असलेली काचेची शिशीने फिर्यादीच्या डोक्यावर मारून गंभीर जखमी केले. मुख्य आरोपी यश पराते याने चाकुने फिर्यादीला मारून जखमी केले. याप्रकरणी सावंगी (मेघे) पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी यश पराते व त्याचा साथीदार अंकुश तिरपुडे वर्धेतील सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर रामनगर, वर्धा शहर, सावंगी येथे बरेच गुन्हे दाखल आहे. ते दोन महिन्यांपासून पसार होते. दोन्ही आरोपी पुणे जिल्ह्यात राहत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. दोन्ही आरोपी पोलीस स्टेशन सावंगीमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यात पसार असून यश उर्फ प्रसाद पराते हा वर्धा शहर ठाण्यातील दाखल गुन्ह्यातही पसार आहे. अंकुश गजानन तिरपुडे हा एक वर्षाकरिता स्थानबध्दतेवरून सुटून आल्यानंतर लगेच १० दिवसानंतर पो.स्टे. सावंगी मेघे अंतर्गत परिसरात गुन्हा करून पसार झाला होता. दोन्ही आरोपींचा शोध घेतला असता पुणे जिल्हयात, पिंपरी चिंचवड, रावेत, हिंजवडी, वाकड परिसरात असल्याची माहीती मिळाली. गुन्हे शाखेच्या पथकाने १०० ते ते १२५ ठिकाणे तपासणी केली असता यश उर्फ प्रसाद पराते (वय २३), रा. अग्नीहोत्री कॉलेजजवळ, रामनगर, वर्धा आणि अंकुश गजानन तिरपुडे (वय २३), रा. हिंदनगर वर्धा हे वाकड परिसरात एका रेस्टॉरंटमध्ये जेवण करताना मिळून आले. दोघांनाही शिताफीने ताब्यात घेत वर्धा येथे आणून पसार असलेल्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक नूरूल हसन, अपर पोलिस अधीक्षक सागर कवडे यांच्या मार्गदर्शनात, पोलिस निरीक्षक संजय गायकवाड यांच्या निर्देशनात पोलिस उपनिरीक्षक अमोल लगड, गजानन लामसे, यशवंत गोल्हर, रितेश शर्मा, गोपाल बावणकर, मंगेश आदे यांनी केली.

# झाडे लावा, झाडे जगवा ही काळाची गरज - शिवानी देशपांडे




**लोकशाही वार्ता/आर्वी**

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी ,अमरावतीद्वारा संचालित स्थानिक तपस्या पब्लिक स्कूल येथे महाराष्ट्र शासनाद्वारे प्राप्त प्रपत्रानुसार शाळेतील वसुंधरा इको क्लबतर्फे पर्यावरणपूरक कार्यक्रमाचे आयोजना निमित्त वृक्षारोपण तथा वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या शिवानी देशपांडे तथा वसुंधरा इको क्लब चे अध्यक्ष मनोज चांदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी झाडे लावा,झाडे जगवा , करू वृक्षांचे जतन,होईल सुरक्षित वतन, वृक्षवेलींना माना आपुली आई ,प्राणवायू देतो ठाई ठाई अशा वृक्षदिंडीतील अनेक घोषवाक्यांनी शाळेच्या लगतचा एलआईजी कॉलनी, पांडुरंग वॉर्ड परिसर विद्यार्थ्यांनी दुमदुमुन सोडण्यात आला. या वृक्षदिंडीला शाळेच्या प्राचार्या शिवानी देशपांडे व मनोज चांदूरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन या प्रसंगी लाभले. त्याचप्रमाणे शाळेच्या परिसरात वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वसुंधरा इको क्लबचे सर्व विद्यार्थी,शाळेतील वैभव देशमुख, प्रकाश फसाटे, प्रदीप इखार , अमृता देशमुख ,संदीप घफाट बाळासाहेब तेलमोरे ,सर्व शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# क्रीडा प्रबोधिनी निवासी व अनिवासी प्रवेशाकरिता कौशल्य चाचणी

**लोकशाही वार्ता/वर्धा**

क्रीडा व युवक सेवा संचालनायाच्या अधिपत्याखालील राज्यातील ११ क्रीडा प्रबोधीमध्ये विविध खेळातील खेळाडूंना प्रवेश देण्यात येणार आहे. यासाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी इच्छुक पात्र खेळाडूंची निवड चाचणीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यातील ११ क्रीडा प्रबोधीमध्ये ॲथलेटीक्स, ज्युदो, शुटिंग, सायकलिंग, वेटलिप्टिंग, हॉकी, बॉक्सिंग, जिम्नॅस्टिक्स, फुटबॉल, कुस्ती, टेबल टेनिस, बॅडमिंटन, जलतरण, आर्चरी, हॅन्डबॉल या खेळातील उदयन्मुख खेळाडूंसाठी क्रीडा प्रबोधीनीमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. जे खेळाडू महाराष्ट्राचे रहिवासी आहेत. सदर प्रवेश प्रक्रियेसाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरावर प्रावीण्य प्राप्त खेळाडूंनी व कौशल्य चाचणीसाठी राज्यस्तरावर सहभागी झालेले १९ वर्षाआतील खेळाडूसाठी खेळनिहाय सरळ व कौशल्य चाचण्यांचे आयोजन जिल्हा व विभाग व राज्यस्तरावर करण्यात आले. निवासी व निवासी प्रवेशाकरिता कौशल्य चाचण्यांचे आयोजन विभागस्तरावर करण्यात आहे. जिल्हास्तरावर आर्चरी, हॅन्डबॉल, बॉक्सिंग, कुस्ती, बॅडमिंटन खेळ अनिवासी प्रवेशासाठी तर ॲ थलेटीक्स, जलतरण, जिम्नॅस्टिक, ज्युदा, शुटींग, सायकलींग, हॉकी, फुटबॉल, टेबल टेनिस, वेटलिप्टींग खेळासाठी सर प्रवेश प्रक्रिया व कौशल्य चाचणी प्रवेशासाठी अर्ज व चाचणी दि. ५ जुलै रोजी जिल्हा क्रिडा संकुल येथे आयोजित करण्यात आली आहे. विभागस्तरावर जलतरण, सायकलींग, जिम्नॅस्टीक, ज्युदो, फुटबॉल, हॅन्डबॉल खेळासाठी चाचणी प्रवेश अर्ज कौशल्य चाचणी दि. ८ ते ९ जुलै रोजी विभागीय क्रिडा संकुल मानकापूर नागपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. सरळ प्रवेशाकरीता व कौशल्य चाचणीकरिता सदर चाचणीसाठी विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रे माहितीसह सादर करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# पैसा किंवा वाणी किडीचे व्यवस्थापन

**लोकशाही वार्ता/वर्धा**

विदर्भातील काही भागा मध्ये मागील वर्षी पेरणीनंतर सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद पिकावर मिलीपेड्स (श्त्त्ज) म्हणजेच पैसा किंवा वाणी या किडीचा काही प्रमाणात प्रादुर्भाव दिसून आला होता. हे लक्षात घेता या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी या किडीचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

पैसा, वाणी, मिलीपिड्स ही एक निशाचर कीड असून सामान्यतः सडणारी पाने तसेच काडी कचरा, कुजणाऱ्या वनस्पती इत्यादी पदार्थांना खाऊन उपजीविका करते साधारणपणे निसर्गात यांची भूमिका कुजलेल्या काडी कचरा विघटन करण्यास मदत करणारा प्राणी अशी आहे तथापि जेव्हा त्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढते तेव्हा ते जमिनीवर संपर्कात येणाऱ्या रोपटे, बियाणे यांना खाऊन नुकसान करतात. जमिनीलगत रोपे कुरतडून टाकतात कालांतराने रोपावर जाऊन पानेसुद्धा कुरतडतात त्यामुळे रोपांची संख्या कमी होऊन शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येऊ शकते.जीवनक्रम : मिलीपिडचे जीवनक्रमात अंडी, अळी व प्रौढ या अवस्था आढळून येतात. अंडी जमिनीत काही इंच खोलीवर टाकली जातात. एक मादी साधारणपणे ३०० च्या जवळपास अंडी घालते. अळीच्या पाच अवस्था आढळून येतात. प्रौढ अवस्था हि प्रदीर्घ काळाची आहे. संपूर्ण जीवनक्रम हा पाच ते सात वर्षात पूर्ण होतो. या किडीच्या वाढीसाठी जमिनीत आद्रता असणे आवश्यक आहे. त्यामुळे पावसाळ्यात किंवा जिथे ओलिताची सोय आहे अश्या ठिकाणी हि कीड जास्त सक्रीय असते. हवामान अनुकूल नसल्यास हि कीड जमिनित सुप्त अवस्थेत राहते.

**उपाय योजना :** मिलीपीडचा (वाणी) प्रादुर्भाव कमी करण्यासाठी शेतातील पालापाचोळा किंवा वाळलेले कुजलेले काडी कचरा गोळा करुन नष्ट करावेत. वाणी रात्री जास्त सक्रीय असल्याने रात्रीच्या वेळी शेतात गवताचे ढिग करुन ठेवावेत आणि सकाळी गवताच्या ढिगाखाली जमा झालेले वाणी जमा करून मिठाच्या किंवा साबणाच्या द्रावणात टाकावेत. शेतातील आर्द्रता आणि लपण्याची ठिकाणे कमी करुन बांधावरील गवत, दगड काढून बांध मोकळा ठेवावा. बऱ्याचदा आर्द्र, घनदाट पिकात जास्त पाणी दिल्यामुळे किंवा संध्याकाळी पिकात पाणी चालू ठेवल्यास वाणीचा प्रादुर्भाव वाढतो. जास्त आर्द्रता व अन्नाचा पुरवठा नसल्यास काही दिवसातच वाणी मरतात. ज्याठिकाणी शेतक-यांनी पेरणीपुर्वी बियाण्याला बिजप्रक्रीया केली आहे. तेथे प्रादुर्भाव कमी आढळून आलेला आहे. पिकामध्ये वेळेवर कोळपणी करावी त्यामुळे जमिनीतील अंडी व लपून बसलेल्या वाणी किडी उघडया पडून नष्ट होतील. चांगला पाऊस पडल्यास या किडींचे नैसर्गीक नियंत्रण होते.

**रासायनिक पद्धतीने नियंत्रण**

ज्या शेतामध्ये वारंवार या किडींचा प्रादुर्भाव होत असेल तेथे पेरणीपूर्वी कार्बोसल्फान (६ टक्के दाणेदार) किंवा क्लोरपायरीफॉस (१० टक्के दाणेदार) किंवा फिप्रोनिल (०.३ टक्के) ५ किलो प्रति १०० किलो शेणखतात मिसळून १ हेक्टर शेतात पसरवावे. सदरील कीटकनाशके प्रयोगामध्ये परिणामकारक आढळून आलेले आहेत.

पेरणी झाल्यावर रोप उगवल्यानंतर या किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास क्लोरपायरीफॉस २० ईसी ३७.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पंपाचे नोझेल दिलेकरून रोपां भोवती वतुर्ळाकार किंवा सरळ ओळीत ड्रेचिंग करावे. एक एकर क्षेत्रात ४० पंपाचे ट्रेचिंग करावे किंवा क्लोरपायरीफॉस ५० टक्के सायपरमेथ्रीन (५ टक्के एसपी) १.५ मिली प्रति लीटर या उपाययोजना शक्यतोवर सांयकाळी कराव्यात. सदर कीडनाशकाची शिफारस मिलीपीड (वाणी) साठी नाही, मात्र कापूस पिकामध्ये आहे. या प्रमाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तत्काळ उपाययोजना कराव्यात असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश देशमुख यांनी केले आहे.

# पांगळेपण आलेल्या युवतीला मिळाले चालण्याचे बळ

## सावंगी रुग्णालयाच्या न्यूरोसर्जरी विभागाद्वारे उपचार

**लोकशाही वार्ता/वर्धा**

घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची, त्यात दोन वेळेच्या जेवणाची मारामार आणि त्यात आकस्मिक उद्भवलेले पांगळेपण, अशा दुरास्थेत वैद्यकीय उपचार कसे घ्यायचे अशी चिंता भेडसावणाऱ्या कुटुंबातील पंचवीस वर्षीय तरुणीला सावंगी (मेघे) येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाच्या न्यूरोसर्जरी विभागात मोफत उपचार मिळाले आणि जगण्याची नवी उमेद निर्माण झाली.



चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील निवासी आरती संतोष डडमल (२५) हिला अचानकच चालताना तोल जाण्याचा आजार सुरू झाला. तिच्या पायातील बळ निघून गेले आणि हळूहळू पायाच्या संवेदनाही नष्ट होऊ लागल्या. चालता येत नसल्याने आरतीला बिछान्यावर पडून राहणे किंवा घरातल्या घरात जमिनीवर फरफटत चालण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. तिचे पांगळेपण वाढू नये म्हणून चंद्रपूर येथील एका खाजगी दवाखान्यात तिला दाखविण्यात आले. मात्र, तेथील उपचारांचा खर्च कुटुंबाला परवडणारा नसल्यामुळे तिला पुन्हा घरी आणण्यात आले.

दरम्यान, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात कमी पैशात उपचार होतात आणि या रुग्णालयाची वरोरा ते सावंगी (मेघे) निःशुल्क बससेवा सुरू असल्याचे माहीत झाल्याने डडमल परिवाराने तिला सावंगी रुग्णालयात आणले. येथे न्यूरोसर्जन डॉ. संदीप इरटवार यांनी रुग्णतपासणी केली व आजारपणाची लक्षणे पाहून एमआयआर करण्यात आले. एमआयआर तपासणीत रुग्णाच्या कंबरेची नस दबल्या गेल्याचे डॉक्टरांच्या निदर्शनास आले. त्याचाच परिणाम आरतीच्या चालण्यावर होत असल्याने तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला डॉ. संदीप इरटवार यांनी दिला. डडमल परिवाराची आर्थिक तजवीज होत नसल्याने त्यांना दिलासा देत शासनाच्या महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेतून पूर्ण अर्थसहाय्य मिळवून देण्याची तरतूद तातडीने करण्यात आली. डॉ. इरटवार यांच्यासह डॉ. जितेंद्र ताडघरे, डॉ. वैभव ढवळी, डॉ. प्रिन्स वर्मा यांनी ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्णत्वाला नेली. शस्त्रक्रियेनंतर फिजिओथेरेपिस्ट डॉ. रघुवीर रघुमहंती, डॉ. सासन, डॉ. स्वर्णा सिंग यांनी तिला भौतिकोपचार दिले.

न्यूरोसर्जरी विभागांतर्गत आरतीची शस्त्रक्रिया करण्यात आली असून तिचे घुसत चालणे कायमचे बंद झाले आहे. आता ती आपल्या बळावरच उभी राहते आणि चालायलाही तिने सुरुवात केली आहे, असे डॉ. संदीप इरटवार यांनी सांगितले. तर, वैद्यकीय चमूसोबतच जनआरोग्य योजनेचा लाभ तसेच भौतिकोपचारासाठी दररोज वरोरा ते सावंगी व पुन्हा वरोरा असा प्रवास रुग्ण बससेवेद्वारे मोफत उपलब्ध करून दिल्यामुळे आरती आणि डडमल परिवाराने संस्थेचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अभ्युदय मेघे यांचेही आभार मानले.

# बोंडसुला येथे शालेय साहित्य वाटप

**लोकशाही वार्ता/सेलू**

तालुक्यातील बोंडसुला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भूषण दिलीपराव जरोदे यांच्या ३१ वा वाढदिवसानिमित्य शालेय साहित्याचे विद्यार्थांना वितरण करण्यात आले. भूषण यांचे वर्ग ३ पर्यंत शिक्षण याच शाळेत झाले. मूळ गाव बोंडसुला असल्यामुळे सामाजिक बांधिलकी जोपासत बालवाडीचे १५ विद्यार्थी तसेच वर्ग १ ते ५ चे २५ विध्यार्थी यांना स्कूल बॅग, वॉटर बॉटल, कंपोस बॉक्स, नोटबुक व इतर शालेय साहित्य वितरण करण्यात आले. याप्रसंगी भूषण जरोदे, दिलीप जरोदे, अनिता जरोदे, पूर्वांतिका जरोदे, डॉ. मेघना डगवार (एमबीबीएस), मुख्याध्यापिका रेवती बोकडे, डफ, रोशनी शिंदे, अर्चना पिपरे, नानाजी जिकार तसेच इतर गावातील मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या वतीने केक कापून भूषण यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थांना खाऊ वाटण्यात आला.

लोकशाही वार्ता
# अमरावती
नागपूर, शनिवार, ६ जुलै २०२४ / ११

गुड मॉर्निंग

## जिल्हाधिकारी यांची जि.प. प्रा. उर्दू शाळोला भेट

**लोकशाही वार्ता/नांदगाव पेठ**

नवीन शैक्षणिक १ जुलैपासून सुरुवात झाली. शाळेच्या पहिल्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करून प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. प्रवेशोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, भाप्रसे राऊत यांनी अमरावती पं. स. अंतर्गत जी.प.उ.प्रा. उर्दू शाळा माहुली जहागीर येथे भेट देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. तसेच विद्यार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात पाठ्यपुस्तकांचे वाटप केले. या प्रसंगी शालेय आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## श्री संत गुणवंत बाबा विद्यालयातील शाळा प्रवेशोत्सव

**लोकशाही वार्ता/अमरावती**

पीपल्स वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित श्री संत गुणवंत बाबा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तळेगाव मोहना, तालुका चांदुर बाजार, जिल्हा अमरावती येथे शाळेच्या प्रांगणामध्ये सकाळच्या वेळेस मनमोहक फुलांप्रमाणे असणाऱ्या मुलांच्या उत्साहाने विद्यालयातील वातावरण उल्हासित होऊन गेले. मोठ्या संख्येने जुने व नवीन विद्यार्थी शाळेच्या वेळेत हजर होते. सर्व विद्यार्थ्यांवरती फुलांचा वर्षाव करून त्यांचे स्वागत विद्यालयात करण्यात आले.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

# विकास आराखड्यांतर्गत इमारती इतर कारणांसाठी वापरणे अयोग्य

## अमरावतीतील विकास आराखड्यांबाबत सरकार उदासीन, ॲड. यशोमती ठाकूर यांची सभागृहात आक्रमक भूमिका

**लोकशाही वार्ता/अमरावती**

अमरावती जिल्ह्याच्या विकासासाठी माजी पालकमंत्री ॲड.यशोमती ठाकूर यांनी तीन अत्यंत महत्त्वाचे विकास आराखडे सरकारला सादर केले होते. याबाबत त्याला प्रशासकीय मान्यता मिळाली, महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात कामही सुरू झाले मात्र या ठिकाणच्या अन्य सोयी सुविधांकडे सरकार दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करीत ॲड.ठाकूर यांनी विधानसभेत औचीत्याच्या मुद्याद्वारे सरकारला धारेवर धरले.

विधानसभेत बोलताना ॲड. ठाकूर म्हणाल्या की, महाविकास आघाडीचे सरकार असताना अमरावती जिल्ह्यातील मोझरी विकास आराखडा, वलगाव विकास आराखडा आणि कौंडण्यपूर विकास आराखडा मंजूर झाले होते. मात्र महायुती सरकारने जाणीवपूर्वक या तीनही विकास आराखड्यांकडे दुर्लक्ष केले असून सोयी सुविधांसाठी निधी दिला जात नाही . यासंदर्भात आपण सरकारला सातत्याने पाठपुरावा करत आहोत, अनेक पत्रे दिली आहेत मात्र सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याची बाब त्यांनी आज सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. मोझरी विकास आराखडा अंतर्गत आध्यात्मिक केंद्र प्रबोधिनी ग्रामसचिवालय यासाठी सुमारे १३ कोटी २८ लाख ६०० रुपयांचा निधी आवश्यक होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कौंडण्यपूर येथील विकास आराखड्याअंतर्गत सुमारे ४२ कोटी ७४ लाख ३०००० रुपयांचा निधी आवश्यक आहे. या ठिकाणी फर्निचर आणि मूलभूत सुविधा तसेच ग्रामसचिवालय करण्यात यावे. तर संत गाडगेबाबा निर्माण भूमी वलगाव येथे विकास आराखड्यासाठी सुमारे दहा कोटी रुपये निधी आवश्यक असून या अंतर्गत फर्निचर ,पाणी ,संगणक आणि अन्य मूलभूत सुविधा करण्यात येणार आहेत मात्र सरकारने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले असून अमरावती जिल्ह्याच्या विकासातील हा अडथळा दूर करावा अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली. मोझरी विकास आराखड्याअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारती या कौशल्य विकासकडे वर्ग केल्या जातात. मात्र, या विकास आराखड्याला पैसे दिले जात नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीव नावरील चित्रफीत दाखवण्यासाठी सुद्धा त्या ठिकाणी जागा नाही आणि सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ॲड. ठाकूर यांनी केला. एकीकडे राज्य सरकार माझी लाडकी बहीण योजना जाहीर करत आहे आणि दुसरीकडे विधिमंडळातील एक बहिण सातत्याने अमरावतीच्या विकासासाठी विकास आराखड यांना प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून प्रयत्न करते आहे. तर सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत आहे, सरकारने याकडे त्वरित लक्ष द्यावे आणि ज्या हेतूसाठी त्या ठिकाणी इमारती बांधल्या जात आहेत त्या कुठेही वर्ग न करता त्याच कामासाठी त्यांचा वापर व्हावा, अशी आग्रही मागणी ॲड. ठाकूर यांनी सभागृहात केली.

# शेतकऱ्याने अर्धवट नाला खोदल्याने पावसाचे पाणी शिरले दुसऱ्यांच्या शेतात

## करजगाव शिरजगाव येथील प्रकार, १५ एकर शेती पाण्याखाली, शेतकरी चिंतेत



**लोकाशाही वार्ता/नांदगाव पेठ**

नजीकच्या मौजे शिरजगाव हद्दीतील शेतकऱ्याने शेतात साचलेले पावसाचे पाणी काढण्यासाठी अर्धवट नाला खोदल्याने नाल्यामधील पाणी वाहून करजगाव शेतशिवारात शिरल्याने जवळपास १५ एकर शेती पाण्याखाली आली आहे.याबाबत पाच शेतकऱ्यांनी अमरावती तहसील येथे प्रकरण दाखल केले असून ऐन पेरणीच्या दिवसात हा प्रकार केल्यामुळे भविष्यात पिके नष्ट होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

करजगाव आणि शिरजगाव या दोन्ही शेतशिवाराच्या मधोमध शिवरस्ता असून शिरजगाव व करजगाव येथील शेतकरी या शिवरस्त्याने ये जा करतात. शिरजगाव येथील शेत सर्वे नं ९२ हे शेत सध्या संदीप माणिकराव शेकार (३५) व सिंधूबाई माणिकराव शेकार (५५) रा. करजगाव पो डवरगाव यांनी खरेदी केले असून यांच्या शेतात उतार असल्याने पावसाचे साचलेले पाणी यांच्या शेतीमधून पुढे असलेल्या पारंपरिक नाल्यामध्ये शिरते. मात्र, संदीप शेकार यांनी काही दिवसांपूर्वी जेसीबी आणून शिवरस्त्याच्या बाजूने खोदकाम सुरू केल्यामुळे करजगाव हद्दीतील शेतकऱ्यांनी विचारणा केली असता शेकार यांनी पावसाचे पाणी जाण्यासाठी नाला खोदतो आणि ते पाणी पारंपरिक नाल्यामध्ये सोडतो असे सांगितले. परंतु शेकार यांनी जेसीबी द्वारे अर्धवट नाला खोदून सोडून दिल्याने आठ दिवसांपूर्वी पाऊस आल्यामुळे सर्व पाणी करजगाव हद्दीतील बंडू रामराव बोबडे, राजेंद्र रामराव बोबडे,चरणदास अवसरे,संजय तायडे रजनी भुयार,ज्ञानेश्वर शेंडे यांच्या शेतामध्ये शिरले. प्रत्येकाकडे दोन ते तीन एकर शेती असून प्रत्येकाच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीच्या भरवश्यावर आहे.मात्र, पावसाचे पाणी अर्धवट नाल्यामुळे इतर शेतकऱ्यांच्या शेतात शिरत असल्याने भविष्यात पिके नष्ट होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे तहसीलदार यांनी याप्रकरणी तातडीने लक्ष देऊन संबंधित शेतकऱ्याला नाला पूर्ण खोदण्यासाठी आदेश द्यावेत किंवा नाला पूर्ववत करून द्यावा अन्यथा शेतकरी स्वतः जेसीबी आणून नाला बंद करतील असा इशारा बंडू रामराव बोबडे, राजेंद्र रामराव बोबडे,चरणदास अवसरे,संजय तायडे रजनी भुयार,ज्ञानेश्वर शेंडे या शेतकऱ्यांनी दिला आहे.

## दृष्टिक्षेप

### कृषी पुरस्काराकरिता प्रस्ताव सादर करा - कृषी आयुक्त

**लोकशाही वार्ता/अमरावती**

राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत सन २०२३ या वर्षामध्ये कृषी व संलग्न क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्ती /गट / संस्था यांच्याकडून विविध कृषी पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. जास्तीत जास्त शेतकरी /गट / संस्था/व्यक्ती यांनी विविध कृषी पुरस्कार प्रस्ताव आपल्या जवळच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे आवाहन कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी केले आहे.कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरिता योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा तसेच कृषी विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्ती/संस्था/गट यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार, सेंद्रिय शेती कृषिभूषण पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार , युवा शेतकरी पुरस्कार व कृषी विभागामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येते.विविध कृषी पुरस्कार प्रस्तावांबाबत अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) दीपाली माडेलवार रुजू

**लोकशाही वार्ता/अमरावती**

महावितरण अमरावती परिमंडळात अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) या पदी बुधवार दिनांक ३ जुलै रोजी रुजू झाल्या आहेत. परिमंडळात



अधीक्षक अभियंता (पा.आ.) या पदावर कार्यरत असलेले दीपक देवहाते यांची अधीक्षक अभियंता अमरावती जिल्हा या पदावर बदली झाल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. वर्ष १९९९ मध्ये तत्कालीन एमएसईबी बोर्डात नागपूर येथे सहाय्यक अभियंता म्हणून रुजू झालेल्या दिपाली माडेलवार यांच्या पाठिशी तत्कालीन बोर्ड आणि महावितरणमध्ये काम करण्याचा २५ वषार्चा अनुभव आहे. सहाय्यक अभियंता म्हणून रूजू झाल्यानंतर, सरळ सेवा भरतीतून उपकार्यकारी अभियंता वर्धा जिल्हा कार्यालय, त्यानंतर सरळ सेवेतूनच अतीरिक्त कार्यकारी अभियंता नागपूर जिल्हा महाल विभागात त्यांनी काम केले आहे.यावेळी महावितरणमध्ये प्रथमच दामिनी पथकाची निर्मिती त्याच्या विभागात करण्यात आली.नंतर हे दामिनी पथक संपूर्ण राज्यभर निर्माण करण्यात आले. त्यानंतर २०१३ मध्ये सरळ सेवेतून कार्यकारी अभियंता पायाभूत आराखडा म्हणून त्यांची मुख्य कार्यालय येथे पदस्थापना झाली. नंतर कार्यकारी अभियंता प्रशासन नागपूर आणि कार्यकारी अभियंता सावनेर विभागाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर पदोन्नतीवर त्यांची बदली अमरावती येथे अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा)या पदावर झाली आहे. मुळच्या नागपूरच्याच असलेल्या दिपाली माडलेवार ह्या अमरावती येथील अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) हे पद स्वीकारणाऱ्या पहिला महिला आहेत. इलेक्ट्रिक इंजिनिअरची पदवी संपादन केलेल्या दिपाली माडेलवार यांनी एम.बी .ए. फायनांन्स आणि अकाऊंटटमधेही पदवी संपादन केली आहे.

## तपोवनला कुलसचिव यांची ११ हजारांची देणगी

**लोकशाही वार्ता/अमरावती**

अमरावती विद्यापीठाचे नवनियुक्त कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी विदर्भी महारोगी सेवा मंडळ, तपोवन संस्थेच्या ७६ व्या वर्धापन दिनी ११ हजार रुपयांची देणगी प्रदान केली.तपोवनचा ७६ वा वर्धापन दिन १ जुलै २४ संस्थेच्या शांतीकुंज येथील खुल्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून निवासी उपजिल्ह ाधिकारी अनिलजी भटकर, तहसिलदार खटके, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. गोविंद कासट, प्रामुख्याने उपस्थित होते.

# पावसाच्या 'पुनर्वसू' महानक्षत्राला सुरुवात, नक्षत्राचे वाहन 'हत्ती'

## नक्षत्रात पहिल्या चरणात पावसाला सुरुवात, १५ ते १८ जुलैदरम्यान सार्वत्रिक पावसाची शक्यता, हत्तीकडून पावसाची अपेक्षा

**लोकशाही वार्ता/चांदूरबाजार**

हवामान शास्त्र विकसित होण्याआधी खगोलशास्त्राचा आधार घेऊन सूर्य, चंद्र, ग्रह, तारे याच्या अक्षांश व रेखांशावरून पावसाचा अंदाज पंचांग शास्त्राद्वारे वर्तविला जात आहे. पंचांग शास्त्राव्दारे हवामान अंदाज वर्तविण्याची ही हजारो वर्षांपासूनची एक शास्त्रीय परंपरा आहे. हे एक थोटांग नसून एक शास्त्र आहे. पाऊस येण्याच्या चार महिने आधीच खगोल शास्त्र आधारे त्याचा अंदाज वर्तविण्याची कला फक्त भारतातच अवगत होती.त्यामुळे शेतकऱ्यांचा आजही पंचांग शास्त्राव्दारे वर्तविल्या जाणाऱ्या हवामानावर विश्वास आहे. पंचांग शास्त्रातील नक्षत्र निहाय हवामान अंदाजातील चौथे पावसाचे महानक्षत्र म्हणजे "पुनर्वसू" नक्षत्र होय.या नक्षत्राला ५ जुलैच्या मध्यरात्री दरम्यान ११ वाजून ४० मिनिटांनी सुरवात झाली आहे.

पंचांग शास्त्र हवामानाचा अंदाज वर्तविताना गणित शास्त्राचा ही वापर करते. या गणित शास्त्राचा उपयोग करून सर्व नक्षत्रांची वाहने कोणती हे ठरविल्या जाते.कारण ग्रह,तारे, नक्षत्रासोबत नक्षत्राचे वाहन ही पावसाचे प्रमाण दर्शविण्यास सहायक ठरते. त्यानुसार या पुनर्वसू नक्षत्राचे वाहन "हत्ती"आहे. सूर्याने पाच जुलैच्या मध्यरात्री दरम्यान ११ वाजून ४० मिनिटांनी पुनर्वसू नक्षत्रात प्रवेश केला आहे. त्यानुसार ग्रह व वाहन हे लक्षात घेता,या नक्षत्राचे पहिले चरणात पावसाला सुरुवात होऊ शकते . त्यानंतर थोडी उघडीप राहील. मात्र १५ जुलै ते १८ जुलै चांगल्या व सार्वत्रिक पाऊसाचे योग दिसून येतात. तसेच या नक्षत्राचे वाहन हत्ती आहे. हत्ती हा जल प्रिय प्राणी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना या नक्षत्राकडून दमदार पावसाची अपेक्षा आहे. या आधीच्या उंदीर, कोल्हा, मोर यांनी दगा दिला. आता हत्ती तरी तारेल काय? याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

हत्ती पाणी अंगावर घेतो,की सोंड फिरवितो, हे येणारा काळच सांगू शकेल. यावर्षी सरकारी व यु ट्यूब वरील सर्वच हवामान अंदाज फोल ठरलेत. पंचांग शास्त्राव्दारे वर्तविण्यात आलेला हा हवामानाचा अंदाज, नक्षत्र प्रवेशकालीन अंदाजावरून घेतलेला आहे. तरी शेतकरी वर्गाने हवामान शास्त्र विभागाचा प्रदेश निहाय ताजा हवामान अंदाज घेऊन आपल्या भागातील शेतीच्या कामाचे नियोजन करावे.

# दर्जेदार पुनर्वसनाचा निर्णय राज्यभरात लागू करावा

## आ. यशोमती ठाकूर यांची विधानसभेत मागणी

**लोकशाही वार्ता/अमरावती**

राज्य सरकारच्या वतीने दर्जेदार पुनर्वसनासाठी केवळ एका मतदार संघाकरिता शासन निर्णय काढण्यात आला. मात्र दर्जेदार पुनर्वसनाची गरज राज्यातील अनेक प्रकल्पांमध्ये असताना केवळ एकाच मतदारसंघासाठी असा निर्णय घेणे योग्य नाही राज्यातील सर्व प्रकल्पांमध्ये दजेर्दार पुनर्वसन व्हावे अशी जोरदार मागणी आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी आज विधानसभेत केली. विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान प्रकल्प पुनर्वसनाचा प्रश्न उपस्थित झाला असता आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांना जाब विचारला.

यावेळी बोलताना ॲड. ठाकूर म्हणाल्या की, दर्जेदार पुनर्वसनाबाबत मदत आणि पुनर्वसन मंत्र्यांना आपण स्वतः भेटून चर्चा केली होती. मात्र त्यानंतर जो जिआर निघाला तो केवळ एका विधानसभा क्षेत्रापुरताच निघाला. एका विधानसभा क्षेत्रापुरता असा जीआर काढून राज्यातील बाकीच्या प्रक ल्पांमध्ये दजेर्दार पुनर्वसनाबाबत उदासीनता दाखवणे योग्य नसल्याचे ॲड. ठाकूर म्हणाल्या. अमरावती जिल्ह्यातील धारवाडा, दुर्गवाडा, लोअर वर्धा, अप्पर वर्धा या प्रकल्पांमध्ये अनेक गावे विस्थापित झाले आहेत या गावांबाबत सरकारने दर्जेदार पुनर्वसनाचा निर्णय घ्यावा म्हणून आपण सातत्याने आग्रही मागणी करत आहोत. रोहनखेडा पर्वतापूर, वलगाव,अप्पर वर्धा, लोवर वर्धा, धारवाडा आणि दुर्गवाडा यासह अमरावती जिल्ह्यातील ज्या प्रकल्पांमध्ये गावे विस्थापित झाले आहेत त्या सर्व गावांबाबत दजेर्दार पुनर्वसनाचा शासन निर्णय आपण त्वरित घ्यावा अशी मागणी ॲड. यशोमती ठाकूर यांनी केली. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी यासंदर्भात मदत आणि पुनर्वसनमंत्री अनिल पाटील यांना दर्जेदार पुनर्वसनाविषयी ॲड. यशोमती ठाकूर यांनी मांडलेल्या मुद्द्यांबाबत दखल घेऊन विस्थापितांना जमिनीचे समान वाटप करण्याबाबत तसेच सर्व जिल्ह्यांमध्ये याबाबत स्पष्टता असावी, असे निर्देश दिले. याला उत्तर देताना मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी ही बाब धोरणात्मक असल्यामुळे याबाबत एकत्र बैठक घेऊन योग्य निर्णय घेतला जाईल, असे सांगितले.

# नारगावंडी येथे गेलेली महावितरणचे दोन्ही कार्यालये धामणगावात येणार

## दुर्गाबक्षसिंह ठाकूर यांच्या प्रयत्नांना यश, वीज कंपनीच्या कार्यकारी अभियंत्याचे आश्वासन

**लोकशाही वार्ता/धामणगाव**

वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता,सहाय्यक अभियंता कार्यालय शहराबाहेर ५ कि.मी. अंतरावर नारगावंडी येथे हलविले आहे. त्यामुळे नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे व मनस्ताप करावा लागत आहे. विजेच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या ग्राहकांना पायपीट करावी लागत आहे.त्यामुळे हे कार्यालय शहरात पूर्ववत सुरू करावे, अशी मागणी हिंगणगावचे सरपंच दुर्गाबक्षसिंह ठाकुर यांनी थेट मुंबई गाठत केली उर्जामंत्र्याकडे मागणी केली होती. १५ दिवसात कार्यालय धामणगावात सुरू न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, याची दखल घेत वीज कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यानी नारगावंडी येथे गेलेले महावितरणचे दोन्ही कार्यालय पुन्हा धामणगावात सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.



वीज ग्राहकांच्या तक्रारी निवारण व सुविधांसाठी शहरातील अमर शहीद भगतसिंग चौकाजवळ असलेले शहर शाखेच्या सहाय्यक अभियंत्यांचे कार्यालय तसेच तालुक्यातील वीज वितरणाचा कारभार चालविणाऱ्या उपकार्यकारी अभियंता यांचे कार्यालय शहराबाहेरील यवतमाळ रस्त्यावर नारगावंडी येथील ३३ के.व्ही.पॉवर मध्ये हलविले आहे. शहरापासून ५ कि.मी. दूर अंतरावर हे कार्यालय हलविल्यामुळे विजेच्या संदर्भात बिलांची दुरुस्ती,नवीन विद्युत जोडणी, विजेच्या तक्रारी घेवून येणाऱ्या ग्राहकांना पायपीट करावी लागत आहे. विशेषतः महिला व वृद्ध ग्राहकांची गैरसोय होत आहे. वेळी-अवेळी विद्युत पुरवठा खंडित झाल्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे.वीज ग्राहकांना पायपीट करावी लागणार नाही यासाठी प्रशासनाने येथे लक्ष देण्याची गरज आहे. वीज ग्राहकांच्या सेवेकरिता कार्यालय आहेत. त्यांच्या त्रासाकरिता नाहीत याचा विसर प्रशासनाला पडल्याचे दिसत असल्याचा आरोप ग्राहक करीत आहे. कार्यालय वीज केंद्रात हलविण्यात आलेले शहरातील सहाय्यक अभियंत्याचे कार्यालय तातडीने शहरात स्थलांतरित करावे,अशी मागणी हिंगणगावचे सरपंच दुर्गाबक्षसिंह ठाकुर यांनी थेट मुंबई गाठत केली उर्जा मंत्र्याकडे मागणी केली होती.दरम्यान वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता एम.आर.आलेगांवकर यांचे तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री उमरे यांनी दुर्गाबक्षसिंह ठाकूर यांच्या निवासस्थानी भेट घेवूनमहावितरण कंपनी धामणगांव रेल्वे शहरामध्ये भाडे तत्वावर जागा मिळविण्यासाठी प्रयत्नरत आहे. जागा मिळाल्यानंतर दोन्ही कार्यालय धामणगांव रेल्वे शहरातील जागेत स्थलांतरित करण्यात येतील, असे आश्वासन दिले आहे.

# तालुक्यात पेंडिंग ई-केवायसी मोहीम शंभर टक्के यशस्वी

## चार दिवसांत ११ हजार ८७५ पेंडिंग ई-केवायसी पूर्ण

**लोकशाही वार्ता/ चांदूरबाजार**

शासनाने शेतकऱ्यांसाठी २०२१-२२ व २०२३ साठी अतिवृष्टी, अवकाळी पाऊस व गारपीटग्रस्त शेतकऱ्यांसाठी अंशतः आर्थिक अनुदान मंजूर केले होते. तालुक्यातील अंदाजे ४५ हजार शेतकऱ्यांना ही मदत मिळायला हवी होती. परंतु चार ते पाच महिन्यांपासून ई-केवायसी न केल्यामुळे हजारो शेतकरी शासनाच्या या मदतीपासून वंचित होते. ई-केवायसी न केलेले शेतकरी या आर्थिक मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा महसूल प्रशासनाने जिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पेंडिंग ई केवायसी पूर्ण करण्यासाठी, जिल्ह्यातील सर्व तहसील मध्ये युध्द पातळीवर मोहीम राबविली.

चांदूरबाजार तालुक्यात स्थानिक महसूल प्रशासनाने, पेंडिंग ई केवायसी मोहीम शंभर टक्के यशस्वी केली आहे.परिणामी स्थानिक महसूल प्रशासनाचे या मोहिमेमुळे



तालुक्यातील, मदतीस पात्र असलेले शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाहीत. तालुक्यात ई केवायसी न केलेल्या शेतकऱ्यांचीसंख्या,११ हजार ८७५ इतकी होती. यासाठी स्थानिक तहसीलदारांनी मिटिंग घेऊन, संबंधितांना आवश्यक मार्गदर्शन केले. काही महत्त्वपूर्ण सूचना करून या कामात हयगय न करता,तीन दिवसांत पेंडिंग ई केवायसी चे काम पूर्ण करण्याची सक्त ताकीद दिली. त्यानुसार तहसीलदारांचे मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार प्रथमेश मोहोड व नायब तहसीलदार राजेश चौधरी यांनी नियोजन तयार केले.या साठी ई-केवायसीची आवश्यक ती माहिती आपत्ती विभागाचे अव्वल कारकून राहुल बोबडे यांनी पुरविली.या शिस्तबद्ध नियोजना मुळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संपर्क साधून,त्यांच्या घरी जाऊन,ई केवायसी करून घेण्यास या शेतकऱ्यांना प्रेरित केले.फक्त चार दिवसांत अकरा हजार आठशे पंच्याहत्तर पेंडिंग ई-केवायसी पूर्ण केल्या. पेंडिंग ई-केवायसी पैकी काही शेतकरी मृत होते.त्यांच्या वारसांना शोधून त्यांच्याकडून प्रतिज्ञा पत्रे करून घेतली.त्यांचे सर्वांचे संमतीने कुटुंब प्रमुखाचा थम्म लावून पेंडिंग ई केवायशी पूर्ण केल्या. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी मंडल अधिकारी,तलाठी,कोतवाल तथा सेतू केंद्र चालक यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

### हे सामूहिक प्रयत्नांचे यश

जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार पेंडिंग ई-केवायसी पुर्ण करण्यासाठी, स्थानिक महसुल नायब तहसीलदार, अव्वल कारकून, मंडल अधिकारी, तलाठी, कोतवाल, सेतू चालक व संगणक ऑपरेटर यांनी सामूहिक परिश्रम घेतले. पेंडिंग ई-केवायसीचे काम अल्पावधीत पूर्ण करणे. हे स्थानिक महसूल विभागाच्या सामुहिक प्रयत्नांचे यश आहे.

**रूणय जक्कूलवार,**
तहसीलदार चांदूरबाजार

# निराधार योजनेमधील अपंगांचे मानधन दरमहा पाच हजार करा

## अपंग जनता दल घालणार मुंबई मंत्रालयाला घेराव

**लोकशाही वार्ता/वरूड**

अपंगांचा जलद गतीने विकास व्हावा म्हणून केंद्र व राज्य शासनाने अनेक योजना व सवलती सुरू केल्या आहेत. परंतु प्रशासनाच्या बोगस कारभारामुळे अपंग या महत्वाच्या योजना व सवलतींपासून वंचित राहत आहेत. या संदर्भात अनेक वेळा आंदोलने, उपोषणे, पत्रव्यवहार करून सुद्धा शासन व प्रशासन जागा होत नसल्यामुळे अपंगांना रस्तावर उतरण्याची वेळ शासनाने अपंगांवर आणली आहे.

अनेक राज्यांमध्ये अपंग निराधार योजनेचे मानधान महाराष्ट्र राज्यापेक्षा जास्त आहे. परंतु महाराष्ट्र राज्यात प्रगतिशील राज्य असूनसुध्दा व सर्वात जास्त केंद्र सरकारला महसुल देणारे राज्य आहे. परंतु अपंगांचे निराधार योजनेत मानधन वाढ करण्याबाबत दुर्लक्ष करीत आहे. नजिकच्या आंध्रप्रदेश राज्याने निराधार योजनेतील अपंगांचे मानधान दरमहा ६हजार रुपये केले आहे.

अपंग जनता दल सामाजिक संघटनेच्या वतीने १४ मार्च २४ रोजी मुंबई मंत्रालयावर सामुहिक आत्मदहन आंदोलनाचा इशारा दिला होता, त्या इशाऱ्याची दखल घेत राज्य शासनाकडून लोकसभेची निवडणूक झाल्यानंतर मानधनात वाढ करण्यात येईल असे संदर्भिय लेखी पत्र क्र. विसओ- २०२४/प्र.क्र.१४/ विसयो आंदोलनादरम्यान चर्चा करून देण्यात आले होते. परंतु अजुन पर्यंत अपंगांच्या मानधन वाढी संदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे आता राज्यातील अपंग हे रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहे.तरी निराधार योजनेचे अपंगांचे मानधन दरमहा ५ हजार रुपये करण्यासाठी मुंबई मंत्रालयाबर अपंगाचे घेराव आंदोलन बुधवार, १० जुलै रोजी करण्यात येईल तरी राज्यातील सर्व आपंगानी आंदोलनामध्ये सहभागी व्हावे ,अशी माहिती अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे राजेंद्र घाटोडे यांनी दिली.

लोकशाही वार्ता
यवतमाळ
गुड मॉर्निंग
नागपूर, शनिवार, ६ जुलै २०२४/१२

## लुक्स कलेक्शन येथे चोरी

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

येथील लुक्स कलेक्शन येथे चोरी करून मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी लुक्स कलेक्शन मेन लाईन यवतमाळ येथील दुकानाचे टेरीसवरून भिंत फोडून आत प्रवेश करून काऊंटरमध्ये ठेवलेले नगदी ४०,००० रुपये चोरून नेले. ही घटना १ जुलैला घडली. याप्रकरणी जितेंद्र प्रेमचंद वाधवाणी यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद केला.

## अपघातात युवक जखमी

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

वाहनाच्या धडकेत इसम जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी दुचाकीने जात असतांना वाहन क्र. एम.एच. ३१ ए.व्ही. ६१९३ च्या चालकाने वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवुन वाहनाला ठोस मारून अपघात केला यामध्ये युवक गंभिर जखमी झाला. याप्रकरणी वासुदेव बाबुसिंग चव्हाण (३०) यांच्या तक्रारीवरून वाहन क्र. एम.एच. ३१ ए.व्ही. ६१९३ च्या चालकाविरुद्ध गुन्हा नोंद केला.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

# नोकरीचा तिसराच दिवस आणि काळाने साधला डाव

## दुचाकीचा अपघात उपचारासाठी नेत असताना मृत्यू

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

गरिबी आणि हलाखीच्या परिस्थितीमुळे अपूर्ण राहिलेल्या अनेक गोष्टी नोकरी लागल्यानंतर पूर्ण करण्याची मनीषा सगळे बाळगून असतात. मात्र उमरखेड तालुक्यातील शिवाजीनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षिका मनीषाच्या नोकरीचा तिसराच दिवस तिच्या आयुष्याचा अखेरचा दिवस ठरला.

कठोर परिश्रम, सततचे प्रयत्न आणि दीर्घ प्रतीक्षेनंतर गरिबीवर मात करण्यासाठी पवित्र पोर्टलद्वारे तरुणीला मिळालेल्या नोकरीचा आनंद औटघटकेचा ठरल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मनीषा अरविंद घोडके (३४) या शिक्षिकेच्या मृत्यूमुळे नियती किती क्रूर असते याचा प्रत्ययच बुधवारी शिक्षण क्षेत्रासह समाजाने घेतला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पहिलीच नियुक्ती, त्यात मुलीचा वाढदिवस शाळेतील विद्यार्थ्यांसोबत साजरा करावा म्हणून शाळेत चॉकलेट घेऊन निघालेल्या



मनीषा यांचा साडीचा पदर दुचाकीच्या चाकात अडकला आणि अपघात झाला. दवाखान्यात उपचारासाठी नेत असताना मनीषा यांचा मृत्यू झाला. मनिषा यांचे माहेर लातूर जिल्ह्यातील उदगीरचे तर नांदेड जिल्ह्यातील मुखेडजवळचे यवत हे त्यांचे सासर. यवत येथील दिगांबर घोडके यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहे. मुलगा दुसऱ्या वर्गात तर मुलगी तिसऱ्या वर्गात शिकत आहे. बीए, बीएड करूनही नोकरी न मिळाल्याने दिगांबर यांनी गावातच झेरॉक्सचे दुकान सुरू केले. तेही चालत नसल्याने बंद करुन दिगांबर व मनीषा कामाच्या शोधात किनवटजवळील गोकुंडा गावात आले आणि तेथेच स्थायिक झाले. दरम्यान, मनीषा यांनी शिक्षक भरतीसाठी तयारी सुरू केली. अभियोग्यता परीक्षेत गुणवत्ता यादीत आल्यानंतर पवित्र पोर्टलद्वारे त्यांची यवतमाळ जिल्हा परिषदेत निवड झाली. संपूर्ण प्रक्रिया होऊन त्यांना उमरखेड तालुक्यातील कोरटा केंद्रातील शिवाजीनगर -२ या प्राथमिक शाळेत नियुक्ती देण्यात आली होती. नोकरीमुळे गरीबी आणि हलाखीची परिस्थिती दूर होईल म्हणून सर्व कुटुंबीय आनंदात होते. सोमवारी १ जुलै रोजी शाळा सुरु होताच शाळेत हजर झालेल्या मनीषा मुलांमध्ये हरवून गेल्या. दोन दिवसांत मुलांनाही नवीन शिक्षिका आवडल्या. मात्र बुधवारी शाळेत पोहोचण्याआधीच घात झाला. गोकुंडा येथून १० किमी अंतरावर असलेल्या शिवाजीनगर शाळेत जाण्यासाठी मनीषा पती आणि मुलासह दुचाकीवर निघाल्या. टाकळी ते दराटी या गावादरम्यान असलेल्या पुलावर त्यांच्या साडीचा पदर अचानक दुचाकीच्या मागच्या चाकात अडकला आणि त्या रस्त्यावर कोसळल्या. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. पतीने त्यांना तातडीने अदिलाबाद येथे उपचारासाठी नेले. पण दवाखान्यात पोहोचण्यापूर्वीच मनीषा यांचा मृत्यू झाला. बुधवारी ३ जुलै रोजी मनीषा यांच्या मुलीचा वाढदिवस होता. त्यामुळे त्या आनंदी होत्या. मुलीच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना वाटण्यासाठी मनीषा यांनी चॉकलेटसुद्धा सोबत घेतले होते. मात्र, चॉकलेट शाळेत पोहोचण्यापूर्वीच मनीषा यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने शिवाजीनगरसह गोकुंडा येथे हळहळ व्यक्त होत आहे. नोकरी लागल्याच्या आनंदात मनीषा यांनी स्वतःचे काही दागिने विक्री करुन गावाकडे घराचे बांधकाम काढले होते. मात्र त्यांचे हे स्वप्नही अधुरे राहिले.

### शिक्षकांच्या दातृत्वातून अडीच लाखांची मदत

मनीषा घोडके यांच्या माहेरची आणि सासरचीही परिस्थिती हलाखीची आहे. शिक्षक म्हणून लागलेली नोकरीच या कुटुंबासाठी आधार होती. परंतु, पहिला पगार हातात पडण्यापूर्वी, नोकरीच्या तिसऱ्याच दिवशी मनीषा यांचा अपघाती मृत्यू झाल्याने दोन्ही कुटुंबे हादरली आहेत. मनीषा यांच्या अपघाती मृत्यूनंतर यवतमाळसह नांदेड जिल्ह्यातील शिक्षकांनी समाज माध्यमांतून सहकाऱ्यांना आवाहन करून अवघ्या एका दिवसात मनीषा यांच्या कुटुंबियांच्या मदतीसाठी अडीच लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम गोळा केली. या मदतीतून मनिषा यांच्या मुलांचे शिक्षणाचे मनोदय घोडके कुटुंबीयांनी व्यक्त केले.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेची साथ

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते महिलांना बँक कार्ड वितरण

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

भारतीय डाक विभागाच्या इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्यावतीने आज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना बँकेचे आधार सीडेड बँक अकाउंट कार्डचे वितरण जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्याहस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अमर गजभिये, इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक यवतमाळ शाखेचे वरिष्ठ व्यवस्थापक चित्रसेन बोदीले, व्यवस्थापक अमोल रंगारी उपस्थित होते. बँक अकाउंट कार्ड सुपूर्द करण्यात आलेल्या लाभार्थी महिला जयश्री राजेंद्र ढोकणे, माया कवडू नगराळे, अर्चना विनोद तिखे, सलोनी बंडू थूल उपस्थित होत्या.

भारतीय डाक अंतर्गत इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे विस्तृत नेटवर्क जाळे संपूर्ण जिल्हाभर पसरलेले आहे. जिल्ह्यात सुमारे ४०४ पोस्ट ऑफिसमधून बँकेचे कार्य चालते. त्यामध्ये ३६३ ग्रामीण भागातील पोस्ट ऑफिस आणि ४० पोस्ट ऑफिस हे शहरी आणि मध्य शहरी आणि शहरी भागात कार्यरत आहेत,



जेथे इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे कार्य चालते.

या ठिकाणी नागरिक संपर्क साधून अवघ्या ५ मिनिटमध्ये आधार सीडेड खाते काढू शकतात. सर्व पोस्टमनकडे डिपार्टमेंट मोबाईल आणि बायोमेट्रिक मशीन दिलेले आहेत, ज्याच्या आधारे लाभार्थ्यांचा अंगठा लावून पडताळणी केली जाते आणि अकाउंट कार्ड दिले जाते. यासाठी कोणतेही कागदपत्र जमा करावे लागत नाही. फक्त आधार क्रमांक आणि मोबाईल सोबत असावा लागतो. लाभार्थीसह जवळपास साडेतीन लक्ष पेक्षा जास्त ग्राहक इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे ग्राहक म्हणून जुळलेले आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेव्यतिरिक्त हे खाते पीएम किसान योजना, रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना, ज्येष्ठ नागरिकांना निराधार योजना इत्यादींसाठी उपयोगी पडते. जिल्ह्यातील सर्व पात्र महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आपल्या गावातील आणि परिसरातील पोस्ट ऑफिसशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## दृष्टिक्षेप

### वाहनासह तीन ब्रास रेती जप्त

**पुसद** - येथील इंदिरानगरमध्ये राहणारा शेख मुनार यांनी त्यांच्या एमएच ४० सीडी २९९६ या क्रमांकाच्या वाहनांमध्ये तीन ब्रास रेती बिना परवाना आणली असताना तहसील कार्यालयातील विवेक गोविंद राव ईमाले यांनी वाहन पकडून त्याच्यावर कारवाई केली आणि संपूर्ण मद्देमाल जप्त केला. या मुद्देमालाची किंमत दोन लाख इतकी आहे. तसेच शेख कलीम शेख मुजफ्फर वय वर्ष ४५ राहणार बेडकी नगर पुसद हा एमएच २६ एडी ११६४ या क्रमांकाच्या वाहनांमधनू एक ब्रास रेती आणत असताना त्याला पोलिसांनी पुसद ते निंबी रोड पुलाजवळ पकडले ही घटना पाच वाजताच्या दरम्यानची आहे या घटने प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### भाजपचे वरिष्ठ नेते डॉ. अरुण कुळकर्णी यांचे निधन

**लोकशाही वार्ता/पांढरकवडा**



भाजपचे वरिष्ठ नेते डॉ. अरुण कुळकर्णी यांचे गुरुवारी पहाटे ३ च्या सुमारास दुःखद निधन झाले. त्यांचे मागे बराच मोठा आप्त परिवार आहे. शुक्रवार दि.५ जुलै रोजी दुपारी १ वाजता त्यांच्या पार्थिव शरीरचे अंत्यसंस्कार करण्यात आले. ३ तारखेला त्यांची प्रकृती ठीक नसल्याने उपचासाठी त्यांना नागपूर येथील खाजगी रूग्णालयात भरती करण्यात आले होते. परंतु उपचार सुरू असतांनाच त्यांची प्राणज्योत मावळली. अरुण कुळकर्णी (पत्की) हे पांढरकवडा शहरातील नावाजलेले व्यक्तिमत्त्व होते. ते सर्वपरिचित होते. असे हे व्यक्तिमत्त्व अचानकपणे निघून गेल्याने सर्वत्र दुःख व्यक्त केल्या जात आहे.

# मॉडर्न पब्लिक स्कूलचा १० वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**लोकशाही वार्ता/उमरखेड**

येथील मॉडर्न पब्लिक स्कूल चा दहावा वर्धापन दिन अतिशय उत्साहात पार पडला. याप्रसंगी शाळेची अतिशय उत्तम अशी सजावट करण्यात आली शाळेत लहान विद्यार्थ्यांच्या करमणुकीसाठी वेगळी सजावट करण्यात आली होती .मॉडर्न पब्लिक स्कूल ही शाळा शिस्तीसाठी नावाजलेली आहे .ती शिस्त कायम राखण्यासाठी शाळेत विद्यार्थी नायक बनवण्यात आले ,त्यांना शिस्त आणि पदाची शपथ प्राचार्य मैत्रेय देशमुख यांच्याकडून देण्यात आली. याप्रसंगी घेण्यात आलेल्या



कार्यक्रमासाठी शाळेच्या अध्यक्षा रेणूश्री देवसरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली .यावेळी शाळेचे मॅनेजर सुधीर तवर , प्राचार्य मैत्रेय देशमुख , प्री प्रायमरी इन्चार्ज सायली पांडे हे उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या विद्यार्थिनी कुमारी आश्लेषा राणे व कुमारी श्रेया केंद्रे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कुमारी अनुजा बेले हिने केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# कनिष्ठ लिपिकांची स्वयंपाकीने केली पीओंकडे तक्रार

## स्थायीत्व प्रमाणपत्रातील चुक दुरुस्त करण्यास टाळाटाळ

**लोकशाही वार्ता/पांढरकवडा**

आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातंर्गत येणाऱ्या घाटंजी तालुक्यातील झटाळा येथील शासकीय आश्रम शाळेतील स्वयंपाकीच्या स्थायीत्व प्रमाणपत्रातील नावात प्रकल्प कार्यालयातील कनिष्ठ लिपिकाने चुक केली. ती चुक दुरुस्त करून देण्याची मागणी त्या स्वयंपाकीने केली असता, तो कनिष्ठ लिपीक टाळाटाळ करीत आहे.

त्याने त्या स्वयंपाकीस शिविगाळ केल्याचा सुध्दा आरोप स्वयंपाकी ने प्रकल्प अधिकाऱ्याकडे केलेल्या तक्रारीतुन केला आहे. बी व्ही मडावी असे तक्रारदार स्वयंपाकीचे नाव आहे. मडावी यांच्या स्थायी प्रमाणपत्राबाबतच प्रस्ताव झटाळा शाळेच्या मुख्याध्यापकाने १ ऑक्टोंबर २०२३ रोजी प्रकल्प अधिकाऱ्याकडे पाठविला होता. त्यांना २० मार्च २०२४ रोजी स्थायीत्व प्रमाणपत्र देण्यात आले. मात्र त्यात मडावी यांच्या नावात चुक असल्याचे निर्देषणास आल्याने मडावी यांनी सदर कनिष्ठ लिपीकाकडे नावात दुरुस्त करण्याची मागणी केली. परंतु त्या लिपिकाने नावात दुरुस्ती तर केलीच नाही. उलट मडावी यांना उध्दट वागणुक देवुन शिविगाळ केल्याचा आरोप मडावी यांनी प्रकल्प अधिकाऱ्यास दिलेल्या तक्रारीतुन केला आहे. शिवाय स्थायीत्व प्रमाणपत्राकरीता आपण त्या कनिष्ठ लिपिकास २ हजार रुपये दिल्याचेही तक्रार नमुद करण्यात आले असुन याची सखोल चौकशी करुन दोषी कनिष्ठ लिपीकावर योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

## व्यावसायिकाचा मृत्यू

**नेर** - किराणा व्यावसायिकाचा स्वतःच्या घरात दुर्गंधीयुक्त मृतदहे आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. ही घटना गुरुवारी बारीपुरा येथे उघडकीस आली. नरेंद्र प्रभुदास बुद्धदेव (५५), रा. बारीपुरा नेर असे मृत व्यावसायिकाचे नाव आहे. ते बारीपुरा परिसरात गेल्या दोन वर्षांपासून एकटेच राहत होते. त्यांचे नेर पोलिस ठाण्यासमोर किराणा दुकान आहे. गेल्या चार दिवसांपासून नरेंद्र बुद्धदेव घराच्या बाहेर न निघाल्याने शेजारच्या लोकांनी त्यांचा भाऊ गणेश बुद्धदेवला फोन केला. यावेळी भाऊ घरी आला असता, आतमध्ये व्यावसायिकाचा मृतदेह आढळून आला.

# मातोश्री प्रमिलादेवी दुलीचंद राठोड शिष्यवृत्तीचे आज वितरण

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत दारव्हा येथे कौतुक सोहळा, आयएएस, आयपीस अधिकारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार

**लोकशाही वार्ता/यवतमाळ**

ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेद्वारे प्रशासकीय सेवेत यावे, यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या संकल्पनेतून दिग्रस, दारव्हा, नेर तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी 'मातोश्री प्रमिलादेवी दुलीचंद राठोड शिष्यवृत्ती योजना' सुरू करण्यात आली आहे. या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या तिन्ही तालुक्यातील विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा उद्या शनिवार, दि. ६ जुलै रोजी दारव्हा येथे आयोजित करण्यात आला आहे.

दारव्हा येथील शिवलॉन मंगल कार्यालयात सकाळी १० वाजता पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कौतुक सोहळ्यात २५६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसह प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे. या



कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड हे उपस्थित राहणार आहेत. हे आयएएस, आयपीएस अधिकारी स्पर्धा परीक्षार्थ्यांना स्पर्धा परीक्षेबद्दल मार्गदर्शन करणार आहेत. दिग्रस, दारव्हा, नेर तालुक्यातील १ हजार २३४ विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती पूर्व परीक्षा दिली. यातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना उद्या शिष्यवृत्ती, प्रमाणपत्राचे वितरण केले जाणार आहे. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण वर्ग अमरावती येथील विदर्भ आयएएस अकॅडमी येथे ८ जुलैपासून सुरू होणार आहे. निवड झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास १० महिने कालावधीच्या या स्पर्धा परीक्षा शिकवणीसाठी अमरावती येथे निवास, भोजन व अन्य खर्च भागविण्यासाठी पालकमंत्री संजय राठोड यांच्यातर्फे प्रतिमाह पाच हजार रुपयांची 'मातोश्री प्रमिलादेवी दुलीचंद राठोड शिष्यवृत्ती' दिली जात आहे. पात्र विद्यार्थ्यांसह स्पर्धा परीक्षार्थिंनी शनिवारी आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# घाटंजी फोटोग्राफर बहुउद्देशीय संस्थेचा अभिनव उपक्रम

## वृक्षारोपणसह घाटंजी शहराचे छायाचित्राचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण

**लोकशाही वार्ता/घाटंजी**

गुरुवार, ४ जुलै रोजी आय लव घाटंजी जयस्तंभ चौक येथे घाटंजी फोटोग्राफर असोसिएशन बहुउद्देशीय संस्था र. न.०३६/२०२४ च्या माध्यमातून अभिनव उपक्रम राबविल्या गेले. यामधे घाटंजी शहराचे छायाचित्र ड्रोन कॅमेऱ्याद्वारे टीपून घाटंजी नगर. प. ला भेट स्वरुपात देण्यात येऊन त्या छायाचित्रणाचे अनावरण कार्यक्रम व वृक्षारोपण, रुक्ष वितरण कार्यक्रम जयस्तंभ चौकात घेण्यात आला.

सदर कार्यक्रमास घाटंजी न.प. मुख्याधिकारी राजू मोट्टेमवार उद्घाटक तथा अध्यक्ष स्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून साहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पंडित, राष्ट्रनिर्माण विचारधाराचे ॲड. गजेंद्र ढवळे,अनंत नखाते, सामाजिक कार्यकर्ते मधूकर निस्ताने, फोटोग्राफर असोसिएशन





अध्यक्ष किशोर ठाकरे हे होते. कार्यक्रम सुरुवात शहीद जयस्तंभास व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली. तदनंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्प गुच्छ व वृक्ष देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थातास मंचावरून मार्गदर्शन करतांना मुख्याधिकारी मोट्टेमवार यांनी घाटंजी विकासासाठी व स्वच्छतेसाठी आम्ही कट्टीबध असून अधिकारी म्हणून कार्य करतांना जनतेचे ही सहकार्य अपेक्षीत आहे असे मत धर्मग्रंथ केले. तसेच घाटंजीत स्वच्छतेस काही दिवसातच जनतेच्या व जनावरांच्या आरोग्यास हानिकारक असलेली निर्बंध पण्णी वापरावर कठोर कार्यवाही करुन पानटपरी, भाजीपाला, किराणा दूकानात सर्रास वापरात येत असलेल्या घातक पंढरीची वापर करत्यावर वेळप्रसंगी वापर करणाऱ्या जनतेस ताखीत देत, दंड लादून स्वच्छतेस महत्त्व पटवून आरोग्यास प्राधान्य देऊ हे आश्वासन दिले. तसेच उपस्थित मान्यवरांनी ही आपले मनोगत व्यक्त करत घाटंजी स्वच्छतेवर,व विकास कामांवर भर दीला.तदनंतर मान्यवर हस्ते घाटंजी शहराचे छायाचित्राचे अनावरण करण्यात येऊन घाटंजी पोलिस स्टेशन परिसरात उपस्थितांना हस्ते पिंपळ, आवळा,बेल,निंब, यांसारख्या प्रजातिचे वृक्ष लागवड करण्यात आली.

सदर कार्यक्रमास घाटंजीतील सामाजिक कार्यकर्ते,न. प. कर्मचारी, फोटोग्राफर अजिंक्य रुईकर, मनीष राठोड, कलोडे,राजू इंगोले, कपील मुनेश्वर,अमोल वारंजे,यश ठाकरे, क्षृतिक धांदे,नासिर शेख, अमित डंभारे,दादाराव राठोड तथा इतर ही फोटोग्राफर असोसिएशन सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम संचालन व प्रस्तावना संस्था सचिव सचिन कणेर्वार यांनी केले तर उपस्थितांचे आभार अजिंक्य रुईकर यांनी मानले.

# बाप समजून घेताना उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या

## प्रा.वसंत हंकारे यांच्या व्याख्यानाने मंत्रमुग्ध झाले ढाणकीकर

**लोकशाही वार्ता/ढाणकी**

ढाणकी शहर पत्रकार संघाच्या वतीने व शहरातील नागरिकांच्या सहकार्यानें दिनांक चार जुलै रोजी स्वर्गीय गुलाब सिंग ठाकूर शाळेच्या प्रागणात प्राध्यापक वसंत हंकारे यांच्या "अपेक्षाचं ओझं वाहणारा बाप" या विषयावर जाहीर व्याख्यान झाले.

आई-वडिलांचे आपल्या जीवनातील स्थान या विषयावर बोलताना प्रा हंकारे यांनी उपस्थित नागरिक व माता भगिनींच्या दाटून आलेल्या भावनेला रस्ता मोकळा करून दिला. आधुनिकरणाच्या नावाखाली आपण आपली संस्कृती विसरत चाललो आहोत, यामुळे पुढच्या पिढीला धोका निर्माण झाला आहे. याला कुठेतरी आळा बसायला पाहिजे या प्रामाणिक हेतूने सदर



व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्राध्यापक वसंत हंकारे यांनी "वरून जरी कठोर दिसत असलेला आपला बाप मनामधून आपल्या लेकरांसाठी कशाप्रकारे झुरतो" हे आपल्या पहाडी आवाजामध्ये उपस्थिताना समजावून सांगितले. आपले आई-वडील आपल्या इच्छा आकांक्षांना मारून लेकरांसाठी ज्याप्रमाणे आपल्या जिवनाचा त्याग करतात त्याची सर जगात कशालाही येऊ शकत नाही असे मत हंकारे यांनी बोलताना व्याख्यानामधून व्यक्त केले. आज आपले आई-वडील आपल्या सोबत असल्याने आपल्याला त्यांची किंमत कळत नाही मात्र आई-वडिलांची किंमत काय असते हे एखाद्या अनाथाला विचारा? असा प्रश्न त्यांनी उपस्थित नागरिक व शाळकरी मुलांमुलीना केला. अतिशय भावनिक अशा या कार्यक्रमांमध्ये उपस्थित नागरिक, महिला व मुलींच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा वाहत होत्या. एखादी मुलगी जेव्हा आपल्या कुटुंबाला सोडून प्रियकरासोबत पळून जाते त्यावेळेस त्या मुलीच्या वडिलांना कशाप्रकारे त्रास सहन करावा लागतो, कशा प्रकारे अपमान होतो हे त्यांनी उपस्थित मुलींना आपल्या शैलीत समजावून सांगितले व त्यांना शपथ दिली की आपल्या आई-वडिलांची मान शरमेने खाली होईल असे कृत्य भविष्यात कधीही करणार नाही. यावेळी उपस्थित असलेल्या शाळकरी मुलींनी देखील आपल्या आई वडिलांबद्दल मंचा वर कृतज्ञता व्यक्त करत अश्रू चा बांध मोकळा केला. सदर कार्यक्रमासाठी शहरातील सर्व मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शवली होती. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी शहरातील दानशूर व्यक्तीने आपले आर्थिक सहयोग दिल्याने हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकला त्याबद्दल ढाणकी पत्रकार संघाने सर्व मान्यवरांचे, नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले.

## तरुणास बेदम मारहाण

**यवतमाळ** – शेतीमध्ये केलेल्या नागरणी, पंजीचे पैसे वारंवार का मागतो, या कारणावरून वाद घालून एकाने तरुणाच्या दुचाकीची चाबी काढली. तसेच त्या तरुणाच्या उजव्या डोळ्याच्या बाजूला मारून तसेच डाव्या हाताच्या बोटाला चावा घेऊन जखमी केले. तोंडावर लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवाने मारण्याची धमकी दिली. ही घटना ३ जुलैला रात्री ७.३० वाजता मारेगाव तालुक्यातील जळका येथे घडली. अविनाश गुलाब तुरविले (२२) रा. जळका असे फियार्दीचे तर संकेत शालिक रायमल (२४) रा. जळका असे गुन्हे दाखल झालेल्या इसमाचे नाव आहे. या प्रकरणी मारेगाव पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (२), कलम ११५, ३५१ (२) (३) नुसार गुन्हे दाखल केले आहे.

## राहुर ग्रामपंचायतमधील भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी

**लोकशाही वार्ता/फुलसावंगी**

राहुर ग्रामपंचायत मध्ये सचिव सरपंच, उपसरपंच यांच्या संगनमताने पाणी कर वसुलीतून जमा झालेले ८७२८० व घर कर वसुलीतून जमा झालेले ४८७३५ या रक्कमेत भ्रष्टाचार केल्याची तक्रार ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी महागाव यांच्याकडे केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून येथील सचिव यांचा मनमानी कारभार सुरू असुन ग्रामपंचायतच्या काही सदस्यांना ते अपमानास्पद वागणूक देतात तसेच सदस्यांना विचारात न घेता रस्त्याची कामे परस्पर टाकने तसेच घरांचे फेरफार भलत्याच व्यक्ती च्या नावाने करून देणे,गाव नमुना ८ सारखी कागदपत्रे परस्पर देणे.अशा प्रकारे मनमानी कारभार राहुर येथील सचिवांनी चालवला आहे. ७ दिवसांच्या आत चौकशी करून त्यांचेवर फौजदारी कारवाई करावी अन्यथा १५ जुलै पासून गटविकास अधिकारी पं.स?.महागाव यांच्या कार्यालया समोर आमरण उपोषणाला बसू या आशयाचे निवेदन ग्रामस्थांनी गट विकास अधिकारी महागाव यांच्याकडे देण्यात आले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य दिलीप जाधव, सीमा नेवरे, शेख शबाना शेख अंबीरसह टिपु शेख,काशीराम जाधव,शेख जावेद शेख अमीर, महादेव मोहिते या ग्रामस्थांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

ग्रामपंचायतमध्ये झालेल्या भ्रष्टचाराची निःपक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी.